

आर एस एस ला ओळखा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या
दस्तावेजांवर आधारित

शम्सुल इस्लाम

आर एस एस ला ओळखा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दस्तावेजांवर आधारित

शम्सुल इस्लाम

लोकायत

सम्यक विद्रोही

लोकशाहीसाठी संघर्ष यात्रा

निमित्त ***सम्यक विद्रोही*** व ***लोकायत*** द्वारा प्रकाशित विशेष आवृत्ती

'आर एस एस ला ओळखा'

लेखक: शम्सुल इस्लाम

प्रकाशक व मुद्रक:

- **सम्यक विद्रोही प्रकाशन**
  १०७४, बी-५, आनंदी प्रासाद अपार्टमेंट, सी वार्ड,
  रविवार पेठ, कोल्हापूर – ४१६०१२.
  संपर्क: गौतम – ०८२७५९१८२९६
- **लोकायत**
  १२९/बी-२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड,
  नळस्टॉप जवळ, पुणे – ४११००४.
  (या पत्त्यावर दर रविवार संध्याकाळी ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची मीटिंग होते.)
  ईमेल: lokayat.india@gmail.com /lokayat.india @lokayat
  संपर्क: अलका – ०९४२२३१९१२९

मुद्रणस्थळ:

आर. एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे – ३०.

© शम्सुल इस्लाम

पहिली आवृत्ती: सप्टेंबर २०१६

सहयोग मूल्य: ₹ १०/-

अनुक्रमणिका

प्रास्ताविक १

१. फॅसिस्ट विचारसरणी आणि हिटलर रा.स्व. संघाचे आदर्श आहेत, हे खरे आहे का? ३

२. राष्ट्रीय ध्वजावर रा.स्व. संघाची निष्ठा आहे? ७

३. रा.स्व. संघ भारतीय संविधानाच्या जागी मनुस्मृती लागू करण्याची मागणी करतो, या देशातील दलितांचे आणि महिलांचे भविष्य काय? ९

४. लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि संघराज्य कल्पनेवर रा.स्व. संघाचा विश्वास आहे का? १५

५. गांधीजींच्या हत्येनंतर रा.स्व. संघावर बंदी का आली होती? १८

६. स्वातंत्र्यलढ्याला रा.स्व. संघाचा पाठिंबा होता का? २०

७. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि अशफाकउल्ला खान यांसारख्या स्वातंत्र्यलढ्यात शहीद झालेल्यांबद्दल रा.स्व. संघाला आदरभाव आहे का? २४

८. अराजकीय रा.स्व. संघ देशाच्या राजकारणाचा वापर कसा करून घेतो? २६

९. रा.स्व. संघ आयएसआयसारख्या संस्थांना सहकार्यच करत नाही का? ३०

१०. मुस्लिम लीग प्रमाणे द्विराष्ट्र संकल्पनेवर रा.स्व. संघाचा विश्वास आहे का? ३३

संदर्भसूची ३६

प्रास्ताविक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (रा.स्व. संघ) असा दावा करतो की तो या देशाचा सर्वात मोठा रक्षक, सर्वात मोठा राष्ट्रभक्त आणि सर्वात मोठा निष्ठावंत आहे! तो व त्याची पिलावळ असलेल्या असंख्य संघटना व व्यक्ती सतत हा प्रचार करण्यात गुंतले आहेत की 'रा.स्व. संघ' आणि 'देशभक्ती' हे एकमेकांचे पर्यायी आहेत.

या देशात कोण निष्ठावान आहे आणि कोण नाही, याचे प्रमाणपत्र देण्याचा ठेका सुद्धा संघानेच घेतला आहे. मात्र रा.स्व. संघ ही अशी संघटना आहे जी स्वतंत्र भारताचे संविधान, तिरंगा राष्ट्रध्वज आणि लोकशाही व धर्मनिरपेक्षता यांसारख्या राष्ट्रीय संकल्पनांवर तर विश्वास ठेवतच नाही, पण भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्येही तिचे काहीच योगदान नव्हते. स्वातंत्र्यलढ्यादरम्यान आपले प्राण पणाला लावणाऱ्या शहीदांकडे संघ किती तुच्छ नजरेने पाहातो हे कळाल्यावर कोणत्याही नागरिकाला चीड येणे साहजिक आहे.

संघाच्याच दस्तावेजांमार्फत त्याचा खरा चेहरा वाचकांपुढे उभा करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. रा.स्व. संघ दलितांबद्दल आणि स्त्रियांबद्दल जो हीन दृष्टिकोन बाळगतो, त्याबद्दलची तथ्ये देखील या पुस्तिकेत मांडली आहेत. तसेच भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात संघाच्या भूमिकेबद्दलची तथ्ये देखील जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. रा.स्व. संघ हा इंग्रजांच्या वसाहतवादी शासनापासून भारताच्या मुक्तीचा पुरस्कर्ता होता व तो स्वतंत्र भारताच्या संविधानिक लोकशाहीशी निष्ठावान आहे असे लोक आजवर मानत आले आहेत. पण रा.स्व. संघाच्या दस्तावेजांमध्ये नमूद असलेली तथ्ये वाचून त्यांची नक्कीच निराशा होईल. संघाने प्रकाशित केलेल्या विविध साहित्यावरून हे सिद्ध होते की तो या देशासाठी एक मोठा धोका आहे व त्याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. विशेषतः अशा काळात जेव्हा देशात १९९८ ते २००४ दरम्यान पंतप्रधान असलेले अटल बिहारी वाजपेयी व गृहमंत्री लालकृष्ण अडवानी हे जाहीरपणे म्हणाले होते की त्यांच्यासाठी रा.स्व. संघाची भूमिका तीच आहे जी जवाहरलाल नेहरूंसाठी गांधीजींची होती. अशाप्रकारे आपल्या लोकशाही व धर्मनिरपेक्ष देशापुढील संकटांच्या गंभीरतेचा अंदाज लावणे अजिबात कठिण नाही.

अटल बिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवानी यांनी पुनःपुन्हा आपण संघाचे 'स्वयंसेवक' असल्याचे घोषित केले आहे. २०१४ साली सत्तारूढ झालेले पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्यांच्या मंत्रीमंडळातील अनेक सदस्य व राज्यांमधील भाजपचे मुख्यमंत्री हे सर्वच संघाचे सदस्य असल्याचे जाहीरपणे कबूल करत आहेत. लालकृष्ण अडवानींनी तर रा.स्व. संघाला भाजपची 'नाळ' म्हणून संबोधले आहे. त्यांच्या म्हणण्याचा स्पष्ट

अर्थ आहे की जशी आई तिच्या गर्भाशयातल्या बाळाच्या पोषणासाठी नाळेद्वारे अन्न पुरवते, त्याचप्रमाणे रा.स्व. संघ हा भाजपला आवश्यक तो सर्व खुराक उपलब्ध करून देतो. त्यामुळे रा.स्व. संघाने पांघरलेलं 'अराजकीय' संघटनेचं सोंग आता गळून पडलंय. संघ आता त्याचे खरे रंग दाखवत मुस्लिम लीगच्या रस्त्यावरच वाटचाल करतोय. या देशाला धर्माधिष्ठित राष्ट्रात परिवर्तित करण्याच्या कामात संघ गुंतला आहे. या आंतरिक धोक्याबद्दल जर आपण वेळीच जागे नाही झालो तर या देशाचा विध्वंस होण्यापासून कोणीही वाचवू शकणार नाही.

आपला शेजारी राष्ट्र असलेल्या पाकिस्तानच्या विनाश तांडवावरून बोध घेणे फार महत्त्वाचे आहे. १९४७ साली पाकिस्तानने धर्माधिष्ठित राष्ट्र बनण्याचा निर्णय घेतला होता. धर्माधिष्ठित राष्ट्र बनलेल्या पाकिस्तानमध्ये जे काही घडले व घडत आहे, त्या सर्व गोष्टी आपल्या देशासाठीही धोक्याच्या घंटा आहेत. रा.स्व. संघ आपल्या देशाला त्याच मार्गावर नेऊ इच्छितो ज्यावर ६५ वर्षे वाटचाल केल्यानंतर पाकिस्तान आज विनाशाच्या उंबरठ्यावर उभा आहे. आपल्याला कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या विनाशयात्रेच्या योजनेपासून आपल्या प्राणप्रिय देशाचे रक्षण करावे लागेल.

या पुस्तिकेबाबत कुठलाही गैरसमज होऊ नये यासाठी पुस्तकात दिलेली सर्व उद्धरणे रा.स्व. संघाच्या अधिकृत प्रकाशनांमधून घेतलेली आहेत.

फॅसिस्ट विचारसरणी आणि हिटलर रा.स्व. संघाचे आदर्श आहेत, हे खरे आहे का?

रा.स्व. संघाचे स्वयंसेवक हिटलरला आदर्श मानतात ह्यात काही शंका नाही. हिंदुत्वाचे ते महान कैवारी असल्यामुळे त्यांना निर्लज्जपणे हिटलरच्या पावलावर पाऊल ठेवून अल्पसंख्याकांना नागरी आणि मानवी हक्कांपासून वंचित ठेवण्याचे एकाधिकारशाहीवादी प्रारूप अंगीकारायचे आहे. रा.स्व. संघाचे ज्येष्ठ विचारवंत गोळवलकर गुरुजींच्या *We or Our Nationhood Defined* ह्या पुस्तकात अल्पसंख्यांकांबद्दलचा विशेषतः मुस्लिम आणि ख्रिश्चनांसंदर्भातला त्यांचा फॅसिस्ट दृष्टिकोन स्पष्टपणे मांडलेला आहे. १९३९ मध्ये प्रकाशित झालेल्या ह्या पुस्तकातून रा.स्व. संघाच्या नेत्यांच्या लोकशाही आणि अल्पसंख्यांकांबद्दलच्या विचारांची पुरेशी कल्पना येते. गोळवलकरांनी या पुस्तकात हिटलरच्या नाझी सांस्कृतिक राष्ट्रवादाचे खालील शब्दात गुणगान गायलेले आहे:

> जर्मनांच्या वांशिक अभिमानाचा विषय आज सर्वत्र चर्चिला जात आहे. आपले वांशिक आणि सांस्कृतिक पावित्र्य टिकावे म्हणून जर्मनांनी आपल्या देशातून सेमेटीक वंशाच्या लोकांना म्हणजे ज्यूंना हाकलून लावून जगाला हादरवून सोडले आहे. वांशिक अभिमानाची जपणूक करण्याची ही अत्युच्च पातळीच म्हणावी लागेल. देशातील विविध समुदायांमध्ये अगदी मूलभूत वांशिक आणि सांस्कृतिक भिन्नता असली तर ते सगळे सावरून एकत्रपणे एकदिलानं जगणं प्रत्यक्षात शक्यच नसतं हे जर्मनांनी दाखवून दिलेलं आहे. हिंदुस्थानाला यातून बरंच काही शिकण्याजोगं आणि अंगीकारण्याजोगंही आहे.[1]

गोळवलकरांना निश्चितपणे हिटलरच्या हुकूमशाही फॅसिस्ट पद्धतीने हिंदू राष्ट्र किंवा देश व्हायला हवा होता हे त्याच पुस्तकातील खालील उद्धरणावरून स्पष्ट होते:

> या ज्येष्ठ राष्ट्रांनी अल्पसंख्यांकांचा प्रश्न कसा सोडवला हे विचारात घेण्यासारखे आहे. ते त्यांच्या राजकारणात कोणत्याही वेगळ्या घटकांना मान्यता देत नाहीत. स्थलांतरितांना देशातल्या राष्ट्रीय वंशाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे लागते. आपले वेगळे अस्तित्व, परकीय जन्मस्थान हे सारे विसरून त्या राष्ट्रातील बहुसंख्यांक वंशाची संस्कृती, भाषा आणि आकांक्षांशी एकरूप व्हावे लागते. असे जर त्यांनी केले नाही तर ते केवळ उपरेच राहतात. राष्ट्राने केलेले नियम आणि चालीरिती तर त्यांना बंधनकारक असतीलच, पण

> त्यांना राष्ट्राच्या दयेवर राहावं लागेल. त्यांना विशेष संरक्षण मिळणारच नाही, मग विशेष हक्क आणि अधिकार तर सोडाच. या परकीयांना दोन पर्याय उपलब्ध आहेत. एकतर त्यांनी मिसळून जावे, त्यांची संस्कृती अंगीकारावी, त्यांच्या दयेवर जगावं आणि जोपर्यंत त्यांची मर्जी आहे तोवर आपली गुजराण करावी, किंवा त्यांच्या आदेशानुसार हा देश सोडावा. अल्पसंख्यांकांच्या प्रश्नावर हाच एक उत्तम उपाय आहे. हाच सर्वात तर्कशुद्ध आणि सुयोग्य तोडगा आहे. त्याच्यामुळेच देशातील जीवन स्वस्थ आणि अबाधित राहील. या एकाच उपायामुळे राष्ट्राच्या पोटात नवे राष्ट्र वाढीला लागण्याच्या विकाराला—कर्करोगाला—पायबंद बसेल.[2]

के. बी. हेडगेवार, वि. दा. सावरकर आणि बी. एस. मुंजे यांच्या विचारांतून रा.स्व. संघ जन्माला आला. हे सगळे, अगदी हेडगेवारांनंतर सरसंघचालक झालेले गोळवलकरदेखील फासीवाद आणि नाझीवादाचे भोक्ते होते. भारतीय राजकारणाच्या इटालियन अभ्यासक मर्सिया कसोलारी[3] यांनी रा.स्व. संघ आणि फासीवाद व नाझीवाद यांच्यातील निकटचे नातेसंबंध दाखवण्याचं अग्रगण्य काम केलं आहे. हे नातेसंबंध शोधताना त्यांनी दिल्ली येथील नेहरू मेमोरियल संग्रहालयात उपलब्ध असलेल्या मुंजे यांच्या रोजनिशांचा कसून अभ्यास केला. तिने लिहिले आहे की,

> मुसोलिनीसारख्या इटालियन फासीवादी शासनाचे प्रतिनिधी आणि हिंदुराष्ट्रवादींचे थेट संपर्क हे दाखवतात की हिंदुराष्ट्रवादाचा फॅसिझमच्या विचार आणि व्यवहारातील रस अमूर्त ओढीपेक्षा जास्त होता. भारतीय हिंदूराष्ट्रवाद्यांचा फासीवाद आणि मुसोलिनीतला रस ही प्रासंगिक कुतूहलातून आलेली किंवा काही मोजक्या लोकांपुरती मर्यादित बाब होती असं समजू नये; इटालियन हुकूमशाही आणि तिच्या नेत्यांवर हिंदुराष्ट्रवाद्यांचे—विशेषतः महाराष्ट्रातल्या—लक्ष केंद्रित होते, त्याचीच ही फलश्रुती असावी. त्यांना हुकूमशाही म्हणजे परंपरावादी क्रांतीचे द्योतक वाटत असावी.

मुंजे स्वतः मुसोलिनीला १९ मार्च १९३१ रोजी दुपारी ३ वाजता पलाजो वेनज़िया या फॅसिस्ट सरकारच्या मुख्यालयात भेटले होते. त्यांच्या रोजनिशीत त्यांनी ह्या भेटीबद्दल २० मार्च रोजी लिहून ठेवलेले आहे:

> मी त्यांच्याशी हस्तांदोलन करून म्हणालो, मी डॉ. मुंजे. त्यांना माझ्याबद्दल पूर्ण माहिती होती, भारतीय स्वातंत्रलढ्यात काय घडत आहे याबद्दलही त्यांना

तपशीलात माहिती होती. सिन्योर मुसोलिनींनी मला मी विद्यापीठाला भेट दिली का असे विचारले. मी म्हणालो, मला सैनिकी शिक्षणाबद्दल जाणून घेण्यात रस आहे. मी इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनीच्या सैनिकी शाळांमध्येही जाऊन आलेलो आहे. आता मी इटलीतही त्याच इच्छेने आलो आहे. आणि इथल्या परराष्ट्र विभागातील अधिकाऱ्यांनी आणि युद्ध खात्यातील अधिकाऱ्यांनी मला इथल्या सैनिकी शाळा बघण्याची उत्तम सोयही केली आहे. ह्याबद्दल मी ऋणी आहे. आजच सकाळपासून मी बालिल्ला आणि फॅसिस्ट संघटना बघितल्या आणि मी त्याने खूप प्रभावित झालो. इटलीच्या विकासासाठी आणि भरभराटीसाठी त्यांची आवश्यकता आहे. मला तर त्यांच्यामध्ये आक्षेपार्ह असे काही आढळलेले नाही. मात्र वर्तमानपत्रात त्या संस्थांबद्दल आणि आपल्याबद्दलही फारसं बरं लिहिलं जात नाही, हे मी वाचलेलं आहे.

सिन्योर मुसोलिनी: मग, त्याबद्दल तुमचे काय मत आहे?

डॉ. मुंजे: महोदय, मी त्याने खूपच प्रभावित झालो. प्रत्येक महत्त्वाकांक्षी आणि वर्धिष्णू राष्ट्राला अशा संस्थांची आवश्यकता असते.

सिन्योर मुसोलिनींना हे ऐकून बरे वाटले असावे, ते म्हणाले, "आभारी आहे, पण तुमच्यासमोरचे आव्हान अधिकच कठीण आहे. तरीही तुम्ही यशस्वी व्हावे यासाठी माझ्या तुम्हाला शुभेच्छा आहेत." एवढे बोलून ते उठले, आणि मीही उठून त्यांची रजा घेतली.

रा.स्व. संघाचे आणखी एक ज्येष्ठ सल्लागार वि. दा. सावरकर यांनाही हिटलरच्या नाझीवादाबद्दल आणि मुसोलिनीच्या फॅसिझमबद्दल विशेष प्रेम होते. मदुरा येथे १९४० साली हिंदूमहासभेच्या २२व्या सभेमध्ये अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले,

हिटलरला नाझी म्हणून त्याला मानवी राक्षस म्हणावं आणि चर्चिल स्वतःला लोकशाहीवादी म्हणतो म्हणून त्याला देव म्हणावं यात काहीही तथ्य नाही. ज्या परिस्थितीत जर्मनी त्यावेळी होती ते पाहता नाझीवादामुळेच ती वाचलेली आहे ह्यात काहीही संशय नाही . . .[4]

पुढे सावरकरांनी भारतात फासीवाद आणि नाझीवादाला विरोध करण्याबद्दल नेहरूंची निर्भत्सनाही केली. त्यांच्या मते:

> जर्मनी, जपान, रशिया किंवा इटलीला असं सांगणारे आपण कोण की तुम्ही ही अशीच राज्यव्यवस्था स्वीकारा कारण आम्हाला ती अभ्यासक दृष्टीने आकर्षक वाटते म्हणून? जर्मनीच्या दृष्टीने काय जास्त बरे हे पंडित नेहरूंपेक्षा हिटलरला जास्त माहीत आहे. नाझीवादाच्या आणि हुकूमशाहीच्या जादूई स्पर्शानेच इटली आणि जर्मनीची परिस्थिती प्रचंड सुधारलेली आहे आणि ते कधी नव्हते इतके प्रचंड ताकदवान झाले आहेत. देशाच्या प्रकृतीला अनुकूल औषध हिच राजकीय विचारसरणी आहे हे यातून स्पष्ट होते.[5]

सावरकरांचा हिटलरच्या ज्यू-विरोधी हत्याकांडाला संपूर्ण पाठिंबा होता आणि १४ ऑक्टोबर १९३८ रोजी त्यांनी भारतातील मुस्लिमांच्या प्रश्नाला तेच उत्तर असल्याचेही सुचवले:

> एखाद्या देशाला आकार येतो, तो तिथे राहणाऱ्या बहुसंख्यांमुळे. ज्यूंनी जर्मनीत काय केलं? ते अल्पसंख्य असल्यामुळे त्यांना बाहेर हुसकवून लावलं गेलं.[6]

राष्ट्रीय ध्वजावर रा.स्व. संघाची निष्ठा आहे का?

रा.स्व. संघाने त्यांच्या निर्मितीपासून म्हणजेच १९२५ पासून भारतीय जनतेने एकत्र येऊन ब्रिटिशांशी लढण्याच्या प्रतीकांचा सदैव तिरस्कार केला आहे. त्यातील राष्ट्रध्वज असलेल्या तिरंगी झेंडा हे त्याचे एक समर्पक उदाहरण आहे. डिसेंबर १९२९ मध्ये काँग्रेसने त्यांच्या लाहोर-अधिवेशनात 'पूर्ण स्वराज्य' हे देशाचे अंतिम ध्येय असल्याचे घोषित केले आणि लोकांनी २६ जानेवारी १९३० हा तिरंगी झेंडा फडकवत स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करावा असे आवाहनही केले. (तिरंगा हा देशव्यापी लढ्याचा ध्वज म्हणून तोपर्यंत सर्वमान्य झालेला होता.) त्यावर प्रतिक्रिया म्हणून सरसंघचालक हेडगेवारांनी रा.स्व. संघाच्या सर्व शाखांना परिपत्रक पाठवून राष्ट्रध्वज म्हणून भगव्या झेंड्याचे पूजन करावे असे सांगितले. आजही रा.स्व. संघाच्या कोणत्याही कार्यक्रमात राष्ट्रध्वज म्हणून तिरंगा नसतो ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. रा.स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक मुरली मनोहर जोशींनी १९९१ मध्ये आपल्या राष्ट्रनिष्ठेचं ढोंगीपणाने प्रदर्शन करत श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा फडकवला असला तरी रा.स्व. संघाने राष्ट्रध्वजाची सदैव वंचनाच केलेली आहे, अनादर केलेला आहे, हेच सत्य आहे. हे पुढे दिलेल्या रा.स्व. संघाच्या प्रमुखांच्या विधानांवरूनही ते दिसून येते.

नागपुरात १४ जुलै १९४६ रोजी झालेल्या गुरुपौर्णिमेच्या मेळाव्यात भाषण करताना गोळवलकर म्हणाले की,

> भगवा झेंडाच देशाच्या महान संस्कृतीचं संपूर्णपणे प्रतीक ठरू शकतो. त्यात देवाचं रूप आहे. आमचा पूर्ण विश्वास आहे की एक दिवस असा येईल की ज्या दिवशी संपूर्ण देश भगव्यासमोर नतमस्तक होईल.[7]

स्वातंत्र्य मिळाले त्याच्या पूर्वदिनी (१४ ऑगस्ट, १९४७) जेव्हा भारतीय संविधान सभेने तिरंग्याला राष्ट्रध्वज म्हणून मान्यता दिली, त्याच दिवशी संध्याकाळी प्रकाशित झालेल्या रा.स्व. संघाचं इंग्रजी मुखपत्र *ऑर्गनायझर* मध्ये *'मिस्टरी बिहाईंड भगवा ध्वज'* (भगव्या ध्वजामागचे रहस्य) नावाचा लेख होता. त्यामध्ये पुन्हा लाल किल्ल्याच्या तटावर भगवा ध्वजच फडकवला जावा, अशी मागणी करताना तिरंगी झेंड्याची राष्ट्रध्वज म्हणून निवड केली जाण्याबद्दल खालील शब्दांत टिंगलही केलेली होती:

> केवळ नशीब जोरावर होतं म्हणून सत्तेवर आलेल्यांनी आमच्या हातात हा तिरंगा दिलेला आहे, पण हिंदू त्याचा सन्मानही करणार नाहीत आणि

> स्वीकारणारही नाहीत. तीन ही कल्पनाच आमच्याकडे चांगली मानली जात नाही त्यामुळे तीन रंग असलेला झेंडा मनांवर निश्चितपणे दुष्परिणाम करणारा ठरेल आणि देशासाठी सुद्धा तो घातक ठरेल.

म्हणजेच रा.स्व. संघाच्या मते हिंदू भारतीय राष्ट्रध्वजाचा कधीही आदर करणार नाहीत. तिरंगी झेंडा हा देशासाठी अपशकुनी आणि घातक आहे.[8] स्वातंत्र्यानंतरही जेव्हा तिरंगा हा राष्ट्रध्वज झाला तेव्हा रा.स्व. संघाने त्याला मान्यता द्यायला नकार दिला. गोळवलकरांनी त्यांच्या *बंच ऑफ थॉट्स* (रा.स्व. संघाचे प्रकाशन असलेल्या या पुस्तकात गोळवलकरांचे विविध लेख आहेत) या पुस्तकातील *'ड्रिफ्टींग अॅन्ड ड्रिफ्टींग'* (भरकटणे फक्त भरकटणे) या लेखात यावर जाहीर टिका केलेली आहे. ते लिहितात,

> आपल्या नेत्यांनी या देशासाठी एक वेगळा झेंडा ठरवला आहे. त्यांनी असं का केलं असावं? हे केवळ भरकटण्याचं आणि नक्कल करण्याच्या वृत्तीचं उदाहरण आहे. आपल्या प्राचीन आणि महान देशाला गौरवशाली परंपरा आहे. मग, आपल्याला आपला स्वतःचा असा झेंडा नाही? गत हजार वर्षांपासून आपल्याला आपले स्वतःचे असे एकही राष्ट्रीय प्रतीक नाही? निर्विवादपणे आपल्याकडे आहे. तर मग ही निखालस अर्थहीनता, ही शून्यमनस्कता कशासाठी?[9]

रा.स्व. संघ भारतीय संविधानाच्या जागी मनुस्मृती लागू करण्याची मागणी करतो, या देशातील दलितांचे आणि महिलांचे भविष्य काय?

रा.स्व. संघाची भारतीय संविधानावर किती निष्ठा आहे हे बघायचे तर गोळवलकरांची *बंच ऑफ थॉट्स* या पुस्तकातील खालील विधाने बघावीत. हे पुस्तक म्हणजे फक्त गोळवलकरांचे निवडक लेख नाहीत, तर तो रा.स्व. संघाच्या स्वयंसेवकांचा धर्मग्रंथच आहे.

> आपलं संविधान हे समजायला अत्यंत त्रासदायक आहे, आणि वेगवेगळ्या पाश्चात्य देशांच्या संविधानातून तुकडे तुकडे आणून जुळवल्यामुळे अतिशय तुटक, एकजिनसीपणा नसलेलं बनलं आहे. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आपलं राष्ट्रीय ध्येयधोरण काय किंवा आपल्या जीवनाचं प्रमुख तत्त्व काय याचा एका शब्दानं उल्लेख केलेला नाही.[10]

वास्तविक रा.स्व. संघाला संविधानाच्या ऐवजी मनुस्मृती किंवा मनुने तयार केलेले कायदे हवे होते. हे शूद्रांना आणि स्त्रियांना कमी लेखणारे आहेत हे सर्वश्रुतच आहे. त्यामुळे जेव्हा संविधान समितीने भारतीय संविधान तयार केले, तेव्हा रा.स्व. संघ खुष नव्हता . . . त्यांच्या मुखपत्रात म्हणजे *ऑर्गनायझर*च्या ३० नोव्हेंबर १९४९ च्या संपादकीयात ही तक्रार मांडलेली आहे.

> परंतु, प्राचीन भारतात झालेल्या अद्वितीय संविधानिक विकासाचा काहीही उल्लेख आपल्या संविधानात आलेला नाही. मनूचे नियम हे स्पार्टाच्या लायकरगस किंवा पर्शियन सोलोनच्या खूप आधी लिहिलेले आहेत. आजही मनूने सांगितलेल्या नियमांना, मनुस्मृतीतील प्रतिपादनाला जगाची वाहवा मिळते, आणि लोक मनोभावे त्याचे अनुयायीही बनतात. पण आमच्या संविधानाच्या पंडितांना त्याची काहीही किंमत नाही.

स्वतंत्र भारतात मनुस्मृतीवर आधारित कायद्याची मागणी करताना रा.स्व. संघ आपले ज्येष्ठ गुरू, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक वि. दा. सावरकर यांचीच री ओढत होता. सावरकर म्हणाले होते:

> वेदांनंतर आपल्या हिंदूराष्ट्राला कोणता धर्मग्रंथ अधिक पूजनीय असेल तर तो मनुस्मृती होय. मनुस्मृती हा ग्रंथ प्राचीन काळापासून आपल्या संस्कृतीचा,

चाली-रितींचा व आचार-विचारांचा पाया राहिलेला आहे. मनुस्मृतीने आपल्या राष्ट्राची अध्यात्मिक वाटचाल नियमबद्ध केली आहे. आजही कोट्यवधी हिंदू आपल्या दैनंदिन जीवनात मनुस्मृतीने सांगितलेले नियम पाळतात. आज मनुस्मृती हाच हिंदू कायदा आहे.[11]

मनूचे नियम समाजावर लादून कोणत्या प्रकारची संस्कृती रा.स्व. संघ आणि हिंदुत्ववादी गटांना हवी होती, ते समजायला मनुस्मृतीतील दलित आणि स्त्रियांबद्दलच्या नियमांकडे एक नजर टाकणे पुरेसे होईल. त्यापैकी मानवतेला कमी लेखणारे काही नियम इथे दिले आहेत, त्यांना कुठल्याही स्पष्टीकरणांची गरज नाही.

मनुस्मृतीतील दलित आणि अस्पृश्यांबद्दलचे नियम[12]

१. जगाच्या मांगल्याकरता त्या सृष्टिकर्त्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांची निर्मिती अनुक्रमे त्याच्या मुखापासून, दंडांपासून, मांडीपासून व पायांपासून केली आहे. (अध्याय १, श्लोक ३१)

२. शूद्रांसाठी परमेश्वराने इतर तीनही जातींची सेवा करणे हेच कार्य नेमून दिलेले आहे. (अध्याय १, श्लोक ९१)

३. एकज म्हणजे एकदा जन्माला येणाऱ्याने (म्हणजे शूद्राने) द्विजाचा (मुंज केली जाते त्या बाकी तीनही जाती) अपमान केला असेल तर त्याची जीभ कापली जावी. (८/२७०)

४. जर त्याने अपमानास्पद पद्धतीने कुणा द्विजाचे नाव घेतले वा त्याच्या जातीचा उल्लेख केला तर दहा बोटे लांब असलेल्या लोखंडी नख्या तापवून लाल करून त्याच्या तोंडात घालाव्या. (८/२७१)

५. त्याने जर आगाऊपणे एखाद्या ब्राह्मणाला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून दिली तर राजाने त्याच्या तोंडात व कानात उकळते तेल ओतावे. (८/२७२)

६. खालच्या जातीच्या माणसाने आपल्या कुठल्याही अवयवाने वरच्या जातीच्या माणसाला इजा केली तर मनुची शिकवण अशी आहे की तो अवयव तोडून टाकावा. (८/२७९)

७. त्याने जर हात किंवा काठी उगारली, किंवा रागाच्या भरात लाथ मारली, तर त्याचा हात वा पाय तोडून टाकावा. (८/२८०)

८. खालच्या जातीचा कुणी माणूस स्वतःला वरच्या जातीच्या बरोबरीचे समजून त्याच्याशेजारी आसनावर बसू पाहात असेल तर त्याच्या पार्श्वभागावर तापवलेल्या लोखंडाने शिक्का मारावा किंवा तलवारीने चिरावे आणि त्याला

हद्दपार करावे. (८/२८१)

९. मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे शुद्राने किरकोळ गुन्हा केला तरी त्याला सर्वांत कठोर शिक्षा व्हावी. परंतु मनुस्मृतीतील तोच कायदा ब्राह्मणांसाठी अतिशय सौम्य होतो. आठव्या अध्यायातील ३८० वा श्लोक सांगतो:

"ब्राह्मणास कधीही ठार मारू नये, अगदी त्याने काहीही गुन्हा केला असला तरी. त्याला त्याच्या सर्व संपत्तीसकट कुठलीही शारीरिक इजा न करता जाऊ द्यावे."

रा.स्व. संघासाठी जातीव्यवस्था म्हणजेच हिंदूराष्ट्र होय

मनुस्मतीवर रा.स्व. संघाची इतकी आस्था आहे, याचाच अर्थ त्यांची जातीव्यवस्थेवरही तितकीच आस्था आहे. खरे तर जातीव्यवस्था कायम राखणे हाच रा.स्व. संघाच्या हिंदुराष्ट्रवादाचा गाभा आहे. हिंदू राष्ट्र म्हणजे जातीव्यवस्थाच आहे, असे बिनदिक्कतपणे म्हणण्यात गोळवलकर बिलकुल कचरत नाहीत. त्यांच्या मते हिंदू म्हणजे,

> हिंदू जनता म्हणजे विराट पुरुष, म्हणजे परमात्म्याचे साकार रूप आहे. जरी पुरुषसुक्तामध्ये 'हिंदू' हा शब्द वापरला नसला तरी त्यातील परमेश्वराच्या वर्णनाने—ज्यामध्ये सूर्य व चंद्र हे त्याचे डोळे आहेत. हे आकाश आणि तारे त्याच्या नाभीतून उद्भवले आहे. ब्राह्मण त्याचे शीर, क्षत्रिय त्याचे बाहू, वैश्य त्याच्या मांड्या व शूद्र त्याचे चरण आहेत—हे स्पष्ट होते. याचा अर्थ चातुर्वणात विभागलेली ही हिंदू जनता म्हणजेच आमचा देव आहे. परमेश्वराची ही सर्वोच्च कल्पनाच आमच्या राष्ट्र संकल्पनेचा गाभा आहे. आमच्या विचारात ती भिनली आहे आणि आमच्या संस्कृतीत आढळणाऱ्या विशेष संकल्पना यातूनच जन्मल्या आहेत.[13]

मनूने सांगितलेले स्त्रियांबद्दलचे नियम

१. स्त्रिया दिवसरात्र कुटुंबातील पुरुषांच्या ताब्यात असायला हव्यात. जर त्या कोणत्याही शारीरसुखाची इच्छा धरत असतील तर त्यांना पूर्ण नियंत्रणाखाली ठेवणे आवश्यक आहे. (९/२)

२. बालवयात पित्याने संरक्षण द्यावे, तारुण्यात पतीने, उतारवयात मुलाने संरक्षण द्यावे, कारण स्त्रीला स्वातंत्र्याचा अधिकार नाही. न स्त्री स्वातंत्र्यमर्हती. (९/३)

३. स्त्रियांचे अगदी लहानशादेखील दुर्वर्तनापासूनही रक्षण केले पाहिजे. तसे न केल्यास त्या दोन्ही कुटुंबांच्या जीवनात दुःख आणू शकतात. (९/५)

४. सर्व जातींचे हे परम कर्तव्य आहे, की अशक्त पतीनेदेखील आपल्या पत्नींच्या संरक्षणाची जबाबदारी घ्यावी. (९/६)

५. ताकदीच्या जोरावर स्त्रियांना संपूर्ण ताब्यात ठेवणे कुणालाच शक्य नाही; मात्र पुढील उपायांनी तसे करणे शक्य आहे.

६. पतीने त्याच्या संपत्तीची जपणूक, एकत्रीकरण आणि विनियोग या कामात, तसेच घरात सर्वत्र स्वच्छता ठेवणे, धार्मिक सोपस्कारांची संपूर्ण जबाबदारी घेणे, अन्न रांधणे, तसेच घरातील भांडी, उपकरणे यांची काळजी घेणे अशा कामांमध्ये स्त्रीस गुंतवून ठेवावे.

७. स्त्रियांना सौदर्याची किंमत नसते आणि त्या वयाचाही फारसा विचार करत नाहीत; फक्त पुरुष असला की झाले मग त्या देखण्या वा कुरूप कुणालाही (पुरुषाला) स्वतःला अर्पण करतात. (९/१४)

८. स्त्रियांना काबूत ठेवण्याचे प्रयत्न कितीही काळजीपूर्वक केले तरी त्यांच्या पुरुषांबद्दलच्या लालसेमुळे, चंचल स्वभावामुळे, आणि स्वाभाविक हृदयशून्यतेमुळे त्या पतीशी कधीही बेइमानी करू शकतात. (९/१५)

९. स्त्रीची निर्मिती होत असतानाच शय्यामोह, बैठकमोह, आभूषणमोह, पावित्र्याचा भंग करण्याचा मोह, शहाणपणाचा अभाव, अप्रामाणिकपणा, दुष्टपणा आणि गैरवागणूक ही वैशिष्ट्ये मनूने त्यांना बहाल केलेली आहेत. (९/१७)

१०. स्त्रियांना धर्मशास्त्राच्या आधाराने कोणतेही विधी करण्याचा अधिकार नाही असे हा कायदा सांगतो; स्त्रिया ह्या अबला आणि वेदांमधील ज्ञानाबद्दल अज्ञानी असल्यामुळे असत्याइतक्याच अपवित्रच असतात, हा अंतिम नियम आहे. (९/१८)

वर दिलेल्या मनुस्मृतीच्या उताऱ्यांचे काही वेगळे विश्लेषण करण्याची गरज नाही. त्यात दलित आणि स्त्रियांबद्दल अतिशय ढळढळीतपणे विकृत, विषारी आणि फॅसिस्ट भूमिका आहे. कदाचित त्यामुळेच २० व्या शतकात युरोपमधे हुकूमशाही मूल्यांना लोकप्रिय करण्यात मोठा वाटा असलेला जर्मन दार्शनिक फ्रेडरिक नित्शे (Fredrich Nietzsche) मनुच्या ग्रंथांच्या प्रेमात पडला.

हिंदी-भाषिक पट्टयात हिंदुत्ववादी राजकारण जेव्हापासून जोर पकडू लागले, तेव्हापासुन मनुस्मृतीच्या स्वस्त आवृत्त्यांचा जणू पूरच आला आहे. एका आघाडीच्या हिंदी लघु-पुस्तक प्रकाशकाने काढलेल्या मनुस्मृतीच्या आवृत्तीच्या पृष्ठभागावर खालील शब्दांत उदात्तीकरण करणारी प्रस्तावना आहे:

संविधान व न्याय स्थापित करणारी मनुस्मृती जगातील सर्वात प्राचीन

समाजव्यवस्था आहे. आधुनिक भारतातील समाज व न्यायव्यवस्था मोठ्या प्रमाणात या ग्रंथावर आधारित आहे. प्रत्येक घरात, संस्थेत व समाजात हा ग्रंथ असणे आवश्यक आहे.[14]

या पुस्तक प्रकाशकांना मनुस्मृती स्त्रियांविषयी आणि दलितांविषयी जे विष व द्वेष पेरते त्याबद्दल काहीही चिंता वाटत नाही. अशा पुस्तकांचे विपुल प्रमाणात होणारे प्रकाशन आणि हिंदू मूलतत्त्ववाद्यांमध्ये होत असलेली वाढ (आणि देशभरात दलित व स्त्रियांवर होणाऱ्या वाढत्या हिंसा) यात काहीतरी नाते असावे हे नक्की. या कट्टर हिंदू शक्ती व रा.स्व. संघ ज्या सुवर्ण युगाची स्वप्न पाहतात ते युग देशासाठी घातक आहे हे देशाला एव्हाना कळायला पाहिजे होते. त्यांच्या वाढत्या ताकदीमुळे अखेरीस या देशातील हिंदू दलित आणि सर्व स्त्रिया आपले मानवी अधिकार गमावून बसतील. मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथांबद्दल जो प्रेमभाव या संघटना दाखवतात त्यावरून त्यांचे खरे लक्ष्य दलित आणि स्त्रिया हेच असल्याची बाब अधोरेखित होते.

गोष्ट फक्त मनुस्मृतीशी संपत नाही. रा.स्व. संघाची पुस्तक विक्री केंद्रे विविध पुस्तके–ग्रंथ विकतात. उदा. *संसार कसा करावा* हे स्वामी रामसुखदास यांचं पुस्तक उघडपणे कौटुंबिक हिंसेची शिकवण देतं. गीता प्रेसने स्वस्तात प्रकाशित केलेल्या स्त्रीविरोधी साहित्यांपैकी हे एक आहे. प्रश्न–उत्तर स्वरूपात असलेले आणि हिंदी, इंग्रजीसह इतर भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या या पुस्तकातील काही उतारे पहा:

प्रश्न – नवरा बायकोला त्रास देत असेल वा मारत असेल तर तिने काय करावे?

उत्तर – स्त्रीने हे लक्षात घ्यावे की तिच्या गेल्या जन्मीच्या पापांच्या कर्जाची परतफेड होत आहे आणि यातून ती स्वच्छ होत आहे. तिच्या आई–वडिलांस ही हकीकत समजली तर त्यांनी तिला माहेरी न्यावे. कारण पतीच्या अशा प्रकारच्या वागण्याला तिला सामोरे जावे लागत आहे याचा अर्थ त्यांनी तिला योग्य शिकवण दिली नाहीये.

प्रश्न – आई–वडिलांनी माहेरी नेले नाही तर तिने काय करावे?

उत्तर – अशा परिस्थितीत असहाय्य स्त्री काहीच करू शकत नाही. आपल्या गतजन्मीच्या पापांचे फळ तिने निमूटपणे भोगावे आणि शांतपणे मार सहन करावा. त्यामुळे ती पापमुक्त होईल व कदाचित नवरा तिच्यावर प्रेम करू लागेल.[15]

या पुस्तकात तर अमानुष सतीप्रथेचेही उघड-उघड समर्थन आहे:

> प्रश्न – सतीप्रथा बरोबर आहे का चुकीची?
>
> उत्तर – सती जाणे ही परंपरा नाही. जी स्त्री सत्यवती आहे, जिच्या मनात पतीच्या मागे जाण्याचा उत्साह आहे, ती अग्नीशिवाय जळू शकते आणि अग्नी तिला इजा करू शकत नाही. असं करणं ही परंपरा नाही, पण एका सत्यवती, न्यायप्रिय व अध्यात्मिक सभ्यता असणाऱ्या स्त्रीने स्वतःहून सती गेले पाहिजे.[16]

मनुस्मृतीतील नियमांचा निषेध म्हणून मनुस्मृतीची प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थितीत डिसेंबर १९२७ ला महाडच्या ऐतिहासिक आंदोलनात जाळली होती, याची याठिकाणी दखल घेतली जावी.

मनुस्मृतीचा गजर पुन्हा एकवार मध्यप्रदेशात

मनुस्मृती हाच आपल्या देशाचा मूळ न्यायमार्ग म्हणून त्याचा सर्वत्र प्रचार करण्याचे स्वप्न रा.स्व. संघाने पूर्वापार जपलेले होते. त्याला आताच्या काळात उत्तेजन मिळाले ते २००४ मध्ये रा.स्व. संघाच्या मुरब्बी साध्वी उमा भारती या जेव्हा मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्री म्हणून राज्यशासनाच्या प्रमुख झाल्या तेव्हा. सत्तेवर आल्याबरोबर उमा भारती सरकारने २३ जानेवारी २००४ रोजी फतवा काढला, 'राज्यामध्ये गायींची हत्या करायला बंदी आहे.' या फतव्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे आहे की त्यामध्ये मनुस्मृतीचा दाखला दिला गेलेला आहे. फतवा असा आहेः "मनुस्मृतीने गायीची हत्या करण्याला, हिंस्र प्राण्यांची शिकार करण्याच्या बरोबरीचा गुन्हा मानलेला आहे आणि त्याला कठोर शिक्षा देण्यात यावी असे म्हटले आहे." स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच मनुस्मृतीतल्या नियमांना कायद्याच्या चौकटीत सामावले गेले आणि सरकारने तशी घोषणाही केली. निःसंशयपणे रा.स्व. संघाने भारतात जर राजकीय सत्ता काबीज केली तर स्त्रिया आणि दलितांबद्दलच्या मनुस्मृतीतील नियमांनाही शासकीय मान्यता मिळू शकेल.

लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि संघराज्यकल्पनेवर रा.स्व. संघाचा विश्वास आहे का?

धर्मनिरपेक्षतेच्या विरोधात

रा.स्व. संघ अल्पसंख्यांकांकडून देशाशी संपूर्ण इमानाची अपेक्षा करतो. पण आपले संविधान, न्यायव्यवस्था, कायदे यांच्याशी निष्ठा ठेवणे संघाला आवश्यक वाटत नाही ही गोष्ट निराळी. रा.स्व. संघाच्या *शाखां*मध्ये म्हटल्या जाणाऱ्या *प्रार्थना* आणि *प्रतिज्ञा* यांचा अभ्यास केला तर त्यामध्ये राष्ट्रनिष्ठा आणि हिंदू धर्मनिष्ठा ह्यांना एकच मानलेले आहे हे स्पष्ट होते, जसे मुस्लिम लीगने राष्ट्र आणि इस्लाम यांना एकत्र बांधले होते. रा.स्व. संघाच्या प्रार्थना आणि प्रतिज्ञा दोन्हीही भारतीय राज्यघटनेचे प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या धर्मनिरपेक्ष राज्याच्या मूल्यांच्या थेट विरोधात आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. इथे हेही लक्षात घेतले पाहिजे, की भारतीय संविधानाला विरोध करणारे किंवा अवमान करणारे गट एरवी भारत सरकारच्या रोषाला सामोरे जात आहेत, त्यांना बंदुकीच्या गोळ्या खाव्या लागत आहेत किंवा त्यांची तुरुंगात रवानगी होते आहे; पण त्याच वेळी रा.स्व. संघ मात्र उघडपणे संविधानिक व्यवस्थेच्या वैधानिकतेला विरोध करत असूनही त्यांना देशात राज्य करण्याचा आणि मोकळेपणाने हिंडण्याफिरण्याचा अधिकार आहे.

माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी आणि माजी गृहमंत्री लालकृष्ण अडवानी यांनी लोकशाही आणि सर्वधर्मसमभाव या तत्त्वांना उचलून धरण्याची शपथ घेतली त्याचवेळी हिंदू राष्ट्राच्या स्थापनेसाठी वचनबद्ध असल्याची शपथदेखील घेतली होती जी प्रत्येक रा.स्व. संघाच्या कार्यकर्त्याला घ्यावी लागते हे धक्कादायक आहे.

रा.स्व. संघाची प्रार्थना

> हे वत्सल मातृभूमे, मी तुला सदैव नमस्कार करतो. हे हिन्दुभूमी, तू माझे सुखाने पालनपोषण केलेले आहेस. हे महामंगलमयी पुण्यभूमी, तुझ्यासाठी माझा हा देह समर्पण होवो. मी तुला पुनःपुन्हा वंदन करतो. हे सर्व शक्तिमान परमेश्वरा, हिंदू राष्ट्राचे आम्ही पुत्र तुला सादर प्रणाम करतो. तुझ्याच कार्यासाठी आम्ही कटिबद्ध झालो आहोत. त्या कार्याच्या पूर्ततेसाठी आम्हाला तू शुभाशीर्वाद दे.[17]

प्रतिज्ञा

> सर्वशक्तिमान परमेश्वर आणि माझ्या पूर्वजांना स्मरून मी स्वयंस्फूर्तीने ही प्रतिज्ञा

करतो की मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता होत आहे. माझ्या पवित्र हिंदूधर्माच्या, हिंदू समाजाच्या आणि हिंदू संस्कृतीच्या विकासामुळे भारतवर्षामध्ये सर्वंकष उदात्तता यावी ही त्यामागील इच्छा आहे. संघाने माझ्यावर सोपवलेल्या जबाबदाऱ्यांचे पालन मी प्रामाणिकपणे, निःस्वार्थीपणे, माझा जीव व प्राण त्याकारणी लावून या ध्येयाशी निष्ठा ठेवेन. भारतमाता की जय![18]

याचा अर्थ भारत देश, हे एक संविधानिक राष्ट्र म्हणून त्याच्याशी ते निष्ठावान नाहीत, तर मुस्लिम लीगने ज्याप्रमाणे इस्लामवर आधारित पाकिस्तानची निर्मिती केली त्याचप्रमाणे त्यांनाही धर्माधारित राष्ट्रनिर्मिती करायची होती.

लोकशाहीला विरोध

लोकशाहीला विरोध असल्यामुळे भारताचा कारभार हुकूमशाही पद्धतीने व्हावा अशी मागणी रा.स्व. संघ नेहमीच करत आलेला आहे. १९४० साली उच्चपातळीवरील १३५० कार्यकर्त्यांसमोर दिलेल्या गोळवलकरांच्या भाषणातूनही हे स्पष्ट होते.

एका ध्वजाखाली, एकचालकानुवर्ती, एका विचारसरणीने चालणारा रा.स्व. संघ या महान देशाच्या कानाकोपऱ्यात हिंदुत्वाची ज्योत तेववत आहे.[19]

एक ध्वज, एक नेता आणि एक विचारसरणी ही घोषणा सरळसरळ नाझीवादी आहे आणि हुकूमशाहीवर आधारलेल्या फॅसिस्ट संघटनांकडून उचललेली आहे.

संघराज्य संकल्पनेला विरोध

रा.स्व. संघाला भारतीय संविधानाचे आधारभूत संघराज्यात्मक तत्त्व कदापिही मान्य नाही. हे गोळवलकरांनी १९६१ मध्ये झालेल्या नॅशनल इंटिग्रेशन कौन्सिलच्या पहिल्या सत्राला पाठवलेल्या पत्रामध्ये स्पष्ट दिसते.

आजच्या सरकारचे संघराज्यात्मक स्वरूप फुटीरतावादाला केवळ जन्मच देत नाही तर त्या भावनेचे पोषणही करते. एका अर्थी राष्ट्राचे एकपण समजून घेण्यास नकार देते तसेच त्याचा नाशही करते. त्यामुळे अशा प्रवृत्ती समूळ नष्ट कराव्यात आणि संविधानाचे शुद्ध आणि एकात्म स्वरूप स्थापित करावे.[20]

संघराज्यात्मकतेबद्दल असलेल्या या तिरस्कारामुळेच महाराष्ट्राच्या निर्मितीलाही रा.स्व. संघाने सर्वशक्तीनिशी विरोध केला. गोळवलकर आपण राजकारणी नाही असे म्हणत असूनही महाराष्ट्र निर्मितीच्या विरोधी गटाच्या बैठकांचे ते अनेकदा अध्यक्ष

राहिलेले आहेत. १९५४ मध्ये अशाच एका परिषदेच्या अध्यक्षपदावरून त्यांनी 'भारताला केंद्रीय शासन हवे आणि प्रशासकीय कारभाराच्या दृष्टीने सर्व राज्ये त्यातले प्रदेश असावेत' अशी जोरदार मागणी केली.[21]

रा.स्व. संघाच्या विचारधुरीणांना भारतीय संघराज्याबद्दलच्या या कल्पना काही जाताजाता सुचलेल्या मुळीच नव्हत्या. रा.स्व. संघाचे बायबल असलेल्या *बंच ऑफ थॉट्स*मध्ये 'एकात्मिक राष्ट्र हवे' या नावाचे एक प्रकरण आहे. त्यामध्ये संघराज्याच्या कल्पनेला *उपाय* सांगताना ते लिहितात,

> 'भारत हे एकात्मिक राष्ट्र नाही, तर वेगवेगळ्या वांशिक गटांचे आणि राष्ट्रकांचे केवळ योगायोगाने भौगोलिक सान्निध्य आहे म्हणून शेजारशेजारी राहाणारे आणि एकसंध श्रेष्ठ अशा परकीय वर्चस्वाने अंकित केल्यामुळे एकत्र असणारे लोक आहेत,' असा खोडसाळ प्रचार ब्रिटिशांनी केला आणि तोच आपल्या सध्याच्या नेत्यांनी मुर्खपणे आत्मसात केला. या प्रचाराचा परिणामकारक प्रतिवाद करायचा झाला आणि एकात्मिक राष्ट्राचे लक्ष्य गाठायचे असेल, तर सर्वात महत्त्वाचा आणि प्रभावी मार्ग एकच की आपल्या देशाच्या संविधानातून संघराज्याच्या कल्पनेला कायमचे काढून टाकणे. एका राज्यामध्ये अनेक स्वायत्त वा अर्ध-स्वायत्त राज्ये असावीत ही संकल्पनाच झटकून टाकणे. एक राष्ट्र, एक राज्य, एक न्याय, एक शासक असावा आणि त्यात तुकडे, भाग, विभाग, प्रभाग, भाषावार प्रांत, अशा कुठल्याही अभिमानांना आपल्या एकात्मिकतेत गदारोळ घालण्यास थारा नसावा. त्यासाठी आपण आपले संविधान पुन्हा एकदा तपासून पाहू, आणि दुरुस्त करू, म्हणजे शासनाची एक एकात्मिक रचना स्थापन होईल.[22]

गांधीजींच्या हत्येनंतर रा.स्व. संघावर बंदी का आली होती?

रा.स्व. संघावर ४ फेब्रुवारी १९४८ रोजी देशद्रोही कृत्यांसाठी बंदी आली होती. सरकारने बंदीच्या काढलेल्या आदेशाला स्पष्टीकरणाची गरजच नाही.

> भारत सरकारने आपल्या २ फेब्रुवारी १९४८ ला जारी केलेल्या ठरावात म्हटले आहे की देशातील विद्वेषक आणि हिंसक शक्तींना मूळापासून उखडून टाकण्याचे ठरवले आहे, जे राष्ट्राच्या स्वातंत्र्याला धक्का पोहोचवत असून देशाच्या कीर्तीलाही काळिमा फासत आहेत. या निर्णयाच्या पाठपुराव्यासाठी सरकारने रा.स्व. संघाला बेकायदेशीर जाहीर करून त्यावर बंदी घालण्याचे ठरवले आहे.[23]

सरकारी पत्रकात पुढे बंदीमागचे कारण स्पष्ट करताना म्हटले आहे:

> संघाचे कार्यकर्ते अनिष्ट आणि धोकादायक कृत्ये करत आहेत. देशाच्या अनेक भागात असे दिसून आले आहे की रा.स्व. संघाचे कार्यकर्ते व्यक्तीगत स्वरूपात जाळपोळ, लूटमार, चोरी, दरोडे, डाके घालणे, खून यांसारख्या हिंसक कृत्यांमध्ये सामील आहेत आणि त्यांनी बेकायदेशीर शस्त्रे व दारूगोळा एकत्र केले आहेत. ते लोकांना अतिरेकी मार्गाकडे वळवणे, बंदुकीसारखी शस्त्रे बाळगणे, सरकारबद्दल समाजमनात अप्रीती निर्माण करणे, पोलीस व मिलीटरीला उपद्रव देण्यासाठी प्रोत्साहन देणे अशा कृत्यांसाठी उद्युक्त करणारी पत्रके वाटताना आढळले आहेत.[24]

त्यावेळचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना रा.स्व. संघाबद्दल प्रेम वाटे, हे सर्वश्रुत आहे. रा.स्व. संघही पटेलांची बाजू उचलून धरे. मात्र गांधीजींच्या खुनानंतर रा.स्व. संघाची बाजू घेणे सरदार पटेलांनाही अवघड झाले. ११ सप्टेंबर १९४८ रोजी गोळवलकरांना लिहिलेल्या पत्रात पटेल लिहितात:

> हिंदूंना संघटित करणे, त्यांना मदत करणे ही एक गोष्ट झाली, पण त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्यासाठी निष्पाप आणि अगतिक स्त्री-पुरुष व बालकांना वेठीस धरणे ही दुसरी गोष्ट आहे . . . याशिवाय त्यांचा काँग्रेसला असलेला विरोध, तो ही इतका जहाल की त्यामध्ये व्यक्तिमत्त्व, सभ्यता, शिष्ठसंमत वर्तन या कशाचेच भान ठेवलेले नाही; ह्यामुळे लोकांमध्ये असंतोष निर्माण केला आहे. त्यांची भाषणे सांप्रदायिक विखाराने भरलेली होती. हिंदूंचे

> संघटन करणे आणि त्यांना त्यांच्या संरक्षणासाठी तयार करणे यासाठी याप्रकारे विष पेरण्याची काहीच आवश्यकता नव्हती. या विषाचा परिणाम देशाला भोगावा लागला तो गांधीजींच्या अमूल्य जीवाची किंमत देऊन. आता सरकारच्या किंवा जनतेच्याही मनात रा.स्व. संघाबद्दल सहानुभूतीचा लवलेशही उरलेला नाही. उलट विरोध वाढला आहे. रा.स्व. संघाच्या लोकांनी गांधीजींच्या मृत्युनंतर जेव्हा आनंदोत्सव साजरा केला आणि मिठाई वाटली तेव्हा हा विरोध आणखीनच तीव्र झाला. अशा परिस्थितीत रा.स्व. संघाच्या विरोधात कारवाई करणे सरकारला अटळ होते . . . त्यानंतर आता सहा महिने झालेले आहेत. एवढ्या दिवसानंतर तरी रा.स्व. संघाचे लोक आता ताळ्यावर आले असतील अशी अपेक्षा होती, पण माझ्याकडे आलेल्या अहवालांवरून स्पष्ट दिसते आहे की जुन्या कारनाम्यांना पुन्हा चेतवण्याच्या दिशेने त्यांची पावले पडत आहेत.[25]

रा.स्व. संघ आणि हिंदू महासभा हे दोघेही राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या मृत्युला कारणीभूत होते याचा आणखी एक पुरावा म्हणजे सरदार पटेल यांनी हिंदू महासभेचे पुढारी श्यामा प्रसाद मुखर्जी यांना लिहिलेले एक पत्र. १८ जुलै १९४८ ला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

> गांधीजींच्या खुनाचा खटला अजूनही न्यायालयात सुरू आहे, त्यामुळे या खुनाच्या कटात हिंदू महासभा आणि रा.स्व. संघ यांच्या सहभागाबद्दल मी काही बोलणे योग्य नाही. परंतु आमच्याकडे आलेल्या अहवालानुसार, या दोन संघटनांच्या—विशेषतः रा.स्व. संघाच्या कारवायांमुळे देशात असे वातावरण निर्माण झाले की अशा प्रकारची विकृत घटना घडली. माझ्या स्वतःच्या मनात काहीच शंका नाही की या कटात हिंदू महासभेचा अति जहाल गट सामील होता. रा.स्व. संघाच्या हालचाली आपल्या सरकार व राज्यव्यवस्थेच्या अस्तित्वाला धोकादायक आहेत. आमच्या अहवालानुसार संघावर बंदी घातल्यानंतही या हालचाली अद्याप थांबलेल्या नाहीत. उलट दिवसागणिक त्या वाढतच आहेत आणि रा.स्व. संघाच्या वर्तुळातले लोक अधिक बेधडक होत आहेत.[26]

स्वातंत्र्यलढ्याला रा.स्व. संघाचा पाठिंबा होता का?

राष्ट्राच्या उभारणीमध्ये मोलाची कामगिरी रा.स्व. संघाने केलेली आहे, असा त्यांचा दावा आहे. आम्हाला, या देशाच्या नागरिकांना समजून घ्यायचे आहे की रा.स्व. संघाने ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी राजवटीतून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी नेमक्या कोणत्या चळवळींची उभारणी केली होती? त्यांच्या कोणत्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी परकीय राजवटीचे अत्याचार भोगले होते? त्यांच्यातले कोण स्वातंत्र्यासाठी तुरुंगात गेले होते, किंवा हुतात्मा झाले होते? गोळवलकरांची स्वातंत्र्यलढ्याच्या विविध टप्प्यांबद्दलची वक्तव्ये वाचून तर कुणाही देशभक्ताला धक्काच बसेल:

> आपले दैनंदिन काम करत राहण्यामागे आणखीही एक कारण आहे. वेळोवेळी घडत असलेल्या घटनांमुळे देशात एक अस्वस्थता आहे. अशीच अस्वस्थता १९४२ सालीही होती. त्याआधी १९३०–३१ सालीही आंदोलन झाले होते. त्यावेळी अनेकजण डॉक्टरजींकडे गेले होते (डॉक्टरजी म्हणजे रा.स्व. संघाचे संस्थापक, डॉ. हेडगेवार). त्यांनी डॉक्टरांना म्हटले की ह्या आंदोलनामुळे स्वातंत्र्य मिळेल, तेव्हा त्यात रा.स्व. संघ मागे राहायला नको. तर त्यातल्या एकाने म्हटले की तो तुरुंगात जायलाही तयार आहे. डॉक्टर म्हणाले, जरूर जा, पण मग तुझ्या कुटुंबाची काळजी कोण घेणार? ते सदगृहस्थ म्हणाले, मी ती सगळी तरतूद करून ठेवलेली आहे. दोन वर्षांच्या माझ्या घरखर्चाचीच नाही तर या काळात मला भराव्या लागणाऱ्या दंडाची रक्कमसुद्धा मी त्यात गृहीत धरलेली आहे. यावर डॉक्टरांनी त्याला सांगितले की एवढी जर तुझी तयारी झालेली असेल तर बाहेर पड आणि संघाच्या कामासाठी ती दोन वर्ष तू दे. तेथून घरी आल्यावर ते सद्गृहस्थ ना तुरुंगात गेले ना काम सोडून संघकार्यात पडले.[27]

ह्या प्रसंगावरून स्पष्ट दिसते की रा.स्व. संघाचे नेते प्रामाणिक देशभक्तांचे खच्चीकरण करण्याचा आणि त्यांना स्वातंत्र्याच्या आंदोलनात पडण्यापासून दूर नेण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते.

असहकार चळवळ आणि चले जाव चळवळ हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले मैलाचे दगड म्हणता येतील. पूज्य गोळवलकरांचा त्याबद्दलचा महान सिद्धांत काय म्हणतो पहा:

चळवळीचे दुष्परिणामच होणार. मुले १९२०–२१ च्या चळवळींनंतर हाताबाहेर गेली होती. हा काही कुणा नेत्यावर चिखलफेक करण्याचा प्रयत्न नाही, पण कुठल्याही चळवळीचे हे अटळ परिणाम असतात. आणि हे परिणाम आपल्याला नंतर सावरता येत नाहीत. १९४२ नंतर तर लोकांना वाटायला लागले होते की कायद्याचा विचार करण्याचीच काही गरज नाही.[28]

यावरून गोळवलकरांची अशी इच्छा दिसते की भारतीयांनी अमानुष ब्रिटिशांच्या अत्याचारी आणि काळ्या कायद्यांचा आदर करायला हवा होता. १९४२ च्या चळवळीबाबत संघाचा दृष्टिकोन मांडताना गोळवलकर पुढे म्हणतात,

१९४२ मध्ये देखील लोकांच्या मनात अतिशय तीव्र भावना उसळल्या होत्या. त्याही काळात संघाचे नेहमीचे काम सुरूच होते. संघाने कशातही थेट भाग न घ्यायचे ठरवलेले होते. पण संघाच्या स्वयंसेवकांच्या मनात उलथापालथ होत होती. संघ ही अकार्यक्षम लोकांची संघटना आहे, त्यांच्या म्हणण्यात फारसा दम नाही, असे फक्त बाहेरचे लोकच नव्हे तर आपले स्वयंसेवकही म्हणू लागले होते. त्यांना सगळ्याचा वीट आला होता.[29]

असे असूनही संघाचे एकही प्रकाशन किंवा लेख संघाने 'चले जाव'च्या चळवळीत कोणते मोठे काम केले याबद्दल अप्रत्यक्षही सांगत नाही.

सरसंघचालक गोळवलकरांना त्यांचा परकीय सत्तेविरुद्ध होणाऱ्या आंदोलनांना असलेला विरोध कधीच लपवता आला नाही. मार्च १९४७ पर्यंत थांबून ब्रिटिशांनी जेव्हा हा देश सोडून जाण्याचा निर्णय घेतला तेव्हाही गोळवलकर गुरुजींनी रा.स्व. संघाच्या दिल्लीतील वार्षिक समारंभात भाषण करताना जाहीर केले की संकुचित दृष्टीच्या नेत्यांनी ब्रिटिश साम्राज्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला. आपला मुद्दा स्पष्ट करताना ते म्हणाले, "सामर्थ्यवान परकीयांना आपल्या कमतरतांसाठी जबाबदार धरणे बरोबर नाही."[30] आपल्या जेत्यांबद्दल तिरस्कार निर्माण करणाऱ्या चळवळींचा त्यांनी धिक्कार केला. भाषणाच्या ओघात एक प्रसंग सांगत असताना तर त्यांचे मूळ रूप अधिकच उघड झाले:

एकदा एक मान्यवर जेष्ठ सद्गृहस्थ आपल्या शाखेवर आले. त्यांनी रा.स्व. संघाच्या स्वयंसेवकांसाठी एक नवीन संदेश दिला. शाखेतील स्वयंसेवकांसमोर बोलण्याची संधी दिल्यावर ते अतिशय प्रभावी भाषेत बोलत होते. 'आता फक्त एकच काम करा, ब्रिटिशांना पकडा, मारा, आणि बाहेर फेकून द्या. काय होईल

ते बघू आपण नंतर.' एवढे ते बोलले आणि खाली बसले. ह्या विचारधारेमागे शासनसत्तेविषयीचा राग आणि दुःख आहे आणि त्यातून ही तिरस्कारावर आधारित प्रतिक्रियावादी वृत्ती आहे. आजच्या राजकीय भावनांचा आधार प्रतिक्रिया, संताप व दुःख आहे हे वाईट आहे, मैत्रीभावना विसरून आपल्या जेत्यांच्या प्रति असलेला विरोध आहे.[31]

गोळवलकर गुरुजींविषयी न्याय्यपणाने बोलायचे तर त्यांनी रा.स्व. संघाने ब्रिटिशांना विरोध केला असा दावा कधीही केला नाही. इंदोरमधील १९६० मधल्या त्यांच्या भाषणात ते म्हणाले,

> अनेकांनी ब्रिटिशांना बाहेर घालवून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या ओढीने काम केले. ब्रिटिश अधिकृतपणे निघून गेल्यावर ही पहिली ओढही आटली. खरे म्हणजे या ओढीचीच मुळात काही गरज नव्हती. आपण हे ध्यानात घ्यायला हवे की जी शपथ आपण घेतो, त्यात आपला धर्म आणि आपल्या संस्कृतीचे पूर्ण रक्षण करत देशाच्या स्वातंत्र्याविषयी बोलतो. त्यात ब्रिटिशांच्या जाण्याचा उल्लेखही नाही.[32]

याचा अर्थ, रा.स्व. संघाची परकीय सत्तेला अन्याय्य मानण्याचीही इच्छा नव्हती. गोळवलकर त्यांच्या ८ जून १९४२ च्या भाषणात म्हणतात,

> आजच्या रसातळाला गेलेल्या समाजासाठी संघ कोणालाही जबाबदार धरू इच्छित नाही. माणसं दुसऱ्यांवर दोषारोप करू लागतात, तेव्हा तो त्यांचा कमीपणा असतो. कमजोरांवर झालेल्या अन्यायासाठी बलवानांना दोषी धरण्यात काहीही उपयोग नसतो . . . संघाला आपला अमूल्य वेळ कुणावर टिका करण्यात किंवा दोषारोप करण्यात वाया घालवण्याची इच्छा नाही. मोठा मासा छोट्या माशाला खातो हे आपल्याला माहीत असताना छोट्या माशाला खाल्ल्याबद्दल मोठ्या माशाला दोष देणे हे मूर्खपणाचेच आहे. निसर्गाचा न्याय चांगला असो वा वाईट, तो खरा असतो. आपण त्याला अन्याय्य म्हणून तो बदलणार नाही.[33]

स्वातंत्र्यलढ्याला गैर मानणारे आणि ब्रिटिश सत्तेला गौरवणारे गोळवलकर एकटेच नव्हते. त्यांचे गुरू व रा.स्व. संघाचे संस्थापक, हेडगेवार यांचेही विचार अगदी असेच होते. हेडगेवारांच्या अधिकृत चरित्रात खालील अर्थपूर्ण वाक्य आहे:

संघाची स्थापना झाल्यावर डॉक्टरसाहेब आपल्या भाषणांमध्ये फक्त हिंदू संस्थांचा उल्लेख करत. सरकारवर थेट प्रतिक्रिया कोणतीही नसे.[34]

हेडगेवारांबद्दलच्या रा.स्व. संघाच्या उपलब्ध साहित्यातील ही एक लक्षवेधी बाब आहे की हेडगेवारांनी कुठेही गोरेशाहीचा म्हणजे ब्रिटिशांच्या जुलमी आणि जंगली सत्तेचा पुसटसा उल्लेख किंवा संदर्भही घेतलेला नाही. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातल्या राष्ट्रीय वर्तमानपत्रांची अगदी खोलवर छाननी केली, सर्वदूर आढावा घेतला तरी रा.स्व. संघाने कोणतीही ठोस भूमिका घेतल्याचे आढळत नाही. उलट रा.स्व. संघाने अत्यंत संशयास्पद अशीच भूमिका घेतल्याचे दिसते. सर्व पुरावे फूट पाडण्याकडेच बोट दाखवणारे आहेत आणि संघ आणि त्याचे नेते तर स्वातंत्र्यलढ्यात कधीच भाग घेत नव्हते. एकमेव सहभाग त्यांनी स्वातंत्र्ययुद्धात घेतला असावा तो म्हणजे एकीने ब्रिटिश साम्राज्यवादाशी लढणाऱ्या भारतीय स्वातंत्र्यसैनिकांमध्ये आपल्या हिंदू राष्ट्राच्या घोषणेने फूट पाडण्याचा प्रयत्न करून.

भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि अशफाकउल्ला खान यांसारख्या स्वातंत्र्यलढ्यात शहीद झालेल्यांबद्दल रा.स्व. संघाला आदरभाव आहे का?

रा.स्व. संघाच्या साहित्यामधून या गोष्टीचे असंख्य पुरावे ठामपणे सिद्ध करतात की संघाची भूमिका क्रांतिकारक भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि सहकाऱ्यांनी चालवलेल्या लढ्याच्या पूर्णपणे विरोधात होती. इतकेच नाही तर गांधीजींच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेशी लढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या परिवर्तनवादी मवाळ चळवळींचाही ते तिरस्कार करत.

इथे दिलेला परिच्छेद *बंच ऑफ थॉट्स* या पुस्तकातील “हुतात्मा पण आदर्श नव्हेत” या प्रकरणातील आहे. त्यामध्ये हौतात्म्याची संपूर्ण कल्पनाच नाकारलेली आहे:

> हौतात्म्याला आलिंगन देणारे लोक अतिशय श्रेष्ठ असतात यात काहीच शंका नाही. त्यांचे तत्त्वज्ञानही निर्भिड असते हेही खरे आहे. नशिबावर हवाला ठेवून घाबरटपणाने निमूट जगत राहणाऱ्या सामान्यांपेक्षा ते फार वरच्या पातळीवर असतात. तरीही अशा व्यक्तींना आपल्या समाजात आदर्श मानले जात नाही. आम्ही त्यांच्या हौतातम्याला महानतेची उच्चतम पातळी मानत नाही. कारण शेवटी ते त्यांचा आदर्श गाठण्यात अपयशी ठरले, आणि अपयश म्हणजे त्यांच्यात काहीतरी भयंकर कमतरता होती.[35]

यापेक्षा ह्या हुतात्म्यांबद्दल अधिक अपमानकारक आणि अवमूल्यन करणारे काय असू शकेल?

कोणाही भारतीय नागरिकाला स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिशांशी लढलेल्या हुतात्म्यांबद्दलचे हेडगेवार आणि रा.स्व. संघाच्या लोकांचे हे बोल धक्कादायकच वाटतील. हेडगेवारांच्या चरित्रात लिहिलेले आहे की:

> देशभक्ती ह्याचा अर्थ फक्त तुरुंगात जाणे असा नाही. आपण ह्या वरवरच्या देशभक्तीमागे धावत सुटणे योग्य होणार नाही. ते आग्रह करत असत की वेळ आलीच तर देशासाठी मरण पत्करायला तयार राहायला हवं, पण त्याबरोबरच देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी संघटित करण्यासाठी जगण्याची इच्छा असणेही नितांत आवश्यक आहे.[36]

खरोखर ही किती दुःखद गोष्ट आहे की भगतसिंग, राजगुरू, सुखदेव,

अशफाकउल्ला खान आणि चंद्रशेखर आझाद यांच्यासारख्या 'मूर्खांचा' या 'महान देशभक्त विचारवंताशी' संपर्क आला नाही. त्यांना भेटण्याची महान संधी जर या हुतात्म्यांना लाभली असती, तर 'वरवरच्या देशभक्तीसाठी' ते हुतात्मा होण्यापासून वाचले असते.

ब्रिटिशांविरोधीच्या स्वातंत्र्यलढ्यात आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या क्रांतिकारकांबाबत रा.स्व. संघाच्या नेत्यांच्या दृष्टिकोनाचे वर्णन करायचे झाल्यास 'लज्जास्पद' हा शब्ददेखील अपुरा पडेल. १८५७ च्या महान स्वातंत्र्यलढ्यात देशप्रेमी भारतीयांनी शेवटचा मुघल बादशाह बहादुरशाह जफरचे नेतृत्व स्वीकारले होते. त्याचीही गोळवलकर गुरुजींनी खिल्ली उडवली आहे:

> १८५७ मध्ये हिंदुस्थानच्या शेवटच्या तथाकथित बादशाहने एक नारा दिला होता:
>
> 'गाज़ियों में बू रहेगी जब तलक इमान की
> तख़्ते लंदन तक चलेगी तेग हिंदुस्तान की'
>
> पण अखेर काय झाले? सर्वांना ठाऊकच आहे.[37]

देशासाठी त्याग करणाऱ्या लोकांबद्दल गोळवलकर काय विचार करायचे हे त्यांच्या खालील शब्दांवरून स्पष्ट होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या क्रांतिकारकांना, बेशरमपणे ते जणू काही इंग्रजांचे प्रतिनिधी असल्याप्रमाणे विचारतात:

> याने राष्ट्रहित साधले जात आहे का? त्याग केल्याने समाजामध्ये देशासाठी आपलं सर्वस्व अर्पण करण्याची भावना येत नाही.[38]

ह्याच कारणामुळे रा.स्व. संघाने कुणीही हुतात्मे स्वातंत्र्य चळवळीत जीव उधळण्यासाठी निर्माण केले नसावेत.

अराजकीय असलेला रा.स्व. संघ देशाच्या राजकारणाचा कसा वापर करतो?

रा.स्व. संघ ही सामाजिक–सांस्कृतिक संस्था असून, त्यांना राजकारणात काहीही रस नसल्याचे आपण कायम ऐकत आलो आहोत. द *ऑर्गनायझर* या रा.स्व. संघाच्या मुखपत्राने तर ६ फेब्रुवारी २००० च्या अंकातील संपादकीयात असाही दावा केलेला आहे की,

> रा.स्व. संघ हा राजकीय पक्ष नाही. तो कोणत्याही निवडणुकांमध्ये भाग घेत नाही, या संस्थेचे पदाधिकारी कुठल्याही राजकीय पक्षाचे पदाधिकारीही होत नाहीत. रा.स्व. संघाचे निवडणूक चिन्हही नाही, तसेच त्यातील नेते व सदस्य यांनी राजकीय कार्यालये हवीत असाही प्रयत्न केलेला नाही. राष्ट्रीय कार्यक्रमांसाठी प्रोत्साहन देणारी ही एक सामाजिक–सांस्कृतिक संस्था आहे.

आपण रा.स्व. संघाचा हा दावा गोळवलकरांच्या काही विधानांशी ताडून बघायला हवा. हेडगेवारांच्या निधनानंतर गोळवलकर रा.स्व. संघाचे प्रमुख होते आणि संघाच्या विचारांची मांडणी करणारे थोर अग्रणी मानले जातात. पहिल्या विधानातून आपल्याला समजते की कोणत्या प्रकारची माणसे रा.स्व. संघाकडून राजकारण हाताळण्यासाठी पाठवली गेली, आणि त्यातून संघाला काय अपेक्षित होते. वर्ध्यातील सिंदी गावात १६ मार्च १९५४ साली झालेल्या भाषणात ते म्हणतात,

> आपण या संस्थेचे सभासद आहोत आणि संस्थेची शिस्त आपल्याला मान्य आहे असे जर आपण म्हणत असू तर निवडीला जीवनात काहीही स्थान नाही. जे सांगितले जाईल ते करा. जर कबड्डी खेळा असे सांगितले असेल तर कबड्डी खेळा; जर बैठक घ्या असे सांगितले असेल तर बैठक . . . आपल्यातल्या काहींना राजकारणात काम करा असे सांगितले ह्याचा अर्थ त्यांना राजकारणाबद्दल विशेष रुची होती किंवा ओढ होती असे नाही. राजकारणासाठी ते पाण्याबाहेरच्या माशासारखे तडफडले नसते. त्यांना राजकारण सोडा असे म्हटले तर त्यालाही त्यांचा विरोध नाही. त्यांच्या निवडीची काही गरजच नाही.[39]

हे दुसरे वाक्यही फार महत्त्वाचे आहे आणि ते संघाच्या राजकीय महत्त्वाकांक्षेची ओढ दर्शवते:

> आपल्याला माहीतच आहे की आपले काही स्वयंसेवक राजकारणात काम करतात. तिथे त्यांना कामाच्या गरजांप्रमाणे जाहीर सभा घ्याव्या लागतात, मोर्चे मिरवणूका वगैरे काढाव्या लागतात, घोषणा द्याव्या लागतात. या गोष्टींना आपल्या कामामध्ये खरे म्हणजे थारा नाही. पण एखाद्या नाटकातील भूमिकेप्रमाणे वाट्याला आलेले काम आपल्या क्षमतेनुसार उत्तमप्रकारे सादर करायचे असते. पण काही वेळा स्वयंसेवक नटाच्या भूमिकेच्या बाहेर जातात. त्यांच्या हृदयात त्या कामाबद्दल अमाप आवेश निर्माण होतो, इतके की मग ते त्या कामासाठी निकामी होतात. हे बरोबर नाही.[40]

आपल्याला इथे असं दिसतं की राजकारणात उतरलेल्या राजकीय आश्रित बनवलेल्या स्वयंसेवकांनी एखाद्या नटाप्रमाणे आपली भूमिका वठवावी म्हणजेच रा.स्व. संघाच्या तालावर नाचावे. गोळवलकरांच्या वर दिलेल्या योजनेनुसार राजकीय रचनेवर आपले वर्चस्व राखण्याबद्दल १९५१ साली जनसंघाची (पूर्वाश्रमीचा भाजप) स्थापना झाल्यानंतर नऊ वर्षांनी म्हणजे मार्च १९६० मध्ये त्यांनी अधिक विवेचन केलेले आहे.

भाजपचे अस्तित्व रा.स्व. संघापासून स्वतंत्र आहे का?

रा.स्व. संघाचे नेते सातत्याने सांगत असतात की भाजप एक स्वतंत्र राजकीय पक्ष आहे, तो रा.स्व. संघाच्या अंकित नाही. रा.स्व. संघाच्या अधिकृत प्रकाशनांमध्ये जी तथ्ये आलेली आहेत, त्याबरोबर तुलना करून वर दिलेली माहिती तपासून पाहू शकतो. रा.स्व. संघाची केंद्रीय प्रकाशन संस्था *सुरूची प्रकाशन* यांनी 'परम वैभव के पथ पर' या नावाचे एक पुस्तक १९९७ मध्ये छापले आहे. त्यामध्ये विविध कार्यांसाठी रा.स्व. संघाने निर्माण केलेल्या चाळीस संस्थांची संपूर्ण माहिती आहे. भाजप एक राजकीय पक्ष म्हणून त्यामध्ये मुख्यत्त्वे करून आहे, त्याच्याबरोबर, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, हिंदू जागरण मंच, विश्व हिंदू परिषद, स्वदेशी जागरण मंच, संस्कार भारती ह्यांचाही अंतर्भाव आहे. या पुस्तकाच्या प्रास्ताविकात म्हटलेले आहे की:

> स्वयंसेवक (रा.स्व. संघाचे कार्यकर्ते) करत असलेल्या विविध कार्यांची माहिती दिल्याशिवाय रा.स्व. संघाची ओळख पूर्ण होणार नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन या पुस्तकात स्वयंसेवकांच्या अनेक क्षेत्रांमधल्या कार्याची ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. १९९६ सालापर्यंतचा संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या कामांचा आढावा याठिकाणी आहे . . . आम्हाला विश्वास वाटतो की रा.स्व. संघाची आणि स्वयंसेवकांच्या कार्याची जाण येण्यासाठी या पुस्तकाचा निश्चितच उपयोग होईल.[41]

या पुस्तकामध्ये रा.स्व. संघाने तयार केलेल्या महत्त्वाच्या संस्थांच्या यादीमध्ये भाजप तिसऱ्या क्रमांकावर आहे. रा.स्व. संघ संचलित भाजपची निर्मिती कशी झाली, त्याचा विकास कसा झाला याबद्दल तीन पाने माहिती दिलेली आहे.

रा.स्व. संघ आणि कटकारस्थाने

वरील संघप्रकाशित प्रकाशनांमध्ये रा.स्व. संघ कसा आपल्या सहकारी संघटनांच्या मदतीने गुप्त पण नियोजनबद्ध 'माफिया' प्रमाणे काम करतो हे स्पष्ट होते. रा.स्व. संघ आपल्या अंकित असलेल्या व त्यांची पिलावळ असलेल्या संघटनांबद्दल जाणूनबुजून लोकांमध्ये गोंधळ निर्माण करतो, जेणेकरून कोणत्याही संघटनेशी वेळ पडली तर संबंध नाकारता यावा. उदाहरणार्थ १९९० च्या दशकाच्या अखेरीस हिंदू जागरण मंचाने ख्रिश्चनधर्मीयांवर हल्ले केले. पण जनमत, तसेच प्रसारमाध्यमे व खुद्द संसद हिंदू जागरण मंचाच्या विरोधी जात आहे हे लक्षात येताच या मंचाशी कसल्याही प्रकारचा संबंध नाही असे रा.स्व. संघाने जाहीर केले. अलिकडे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व धर्म संसदेचे कुटिल कारस्थान (संविधान बदलण्याचे) जेव्हा जनतेसमोर उघडे पडले तेव्हा रा.स्व. संघाने या संस्था स्वायत्त आहेत असे घोषित केले. पण १९९८ ते २००४ च्या काळात भाजपप्रणित सरकार आणि या सर्व संघटनांमध्ये मध्यस्थी करण्याचे काम रा.स्व. संघानेच केले होते.

फॅसिस्ट कार्यपद्धतीला अनुसरूनच या सर्व संघटनांच्या कारवाया अगदी गुपचुप चालू असतात. हिंदू जागरण मंचाबाबत तपशीलात हे पुस्तक सांगते:

> हिंदूंना जागृत करण्यासाठी हिंदू जागरण मंचासारखे अनेक मंच १७ राज्यांमध्ये वेगवेगळ्या नावाने सक्रिय आहेत. उदा. दिल्लीत 'हिंदू-मंच', तामीळनाडूमध्ये 'हिंदू-मुण्णाणी', महाराष्ट्रात 'हिंदू-एकजूट'. हे सर्व मंच आहेत, संस्था वा संघटना नाहीत. त्यामुळेच सभासदत्व, संस्थानोंदणी व निवडणुकीचा प्रश्नच उद्भवत नाही.

सरळच आहे की कायद्याच्या आवाक्याबाहेर व सरकारतर्फे चौकशी होऊ नये म्हणून अशा प्रकरची 'माफिया' कार्यपद्धती अवलंबली आहे. संस्थांच्या ह्या पद्धतींमुळे आपल्या कोणत्याही संघटनेशी अथवा व्यक्तीशी चटकन संबंध तोडणे संघाला सोपे होऊन जाते.

रा.स्व. संघ अनेक कट-कारस्थानेही करत असतो. *परम वैभव के पथ पर* मध्ये केलेल्या खुलाशाप्रमाणे, १९४७ साली फाळणीनंतर दिल्लीमध्ये:

> दिल्ली मुस्लिम-लीगचा विश्वास संपादन करण्यासाठी आणि त्यांची कट-

कारस्थाने कळण्यासाठी काही स्वयंसेवकांनी मुसलमान धर्म स्विकारल्याचे सोंग केले.[42]

स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला रा.स्व. संघाचे स्वयंसेवक मुसलमानांचा वेष घालून काय करत होते, याचे उत्तर डॉ. राजेंद्र प्रसाद जे नंतर भारताचे पाहिले राष्ट्रपती झाले यांनी स्पष्ट केले. भारताचे पहिले गृहमंत्री सरदार पटेल यांना १४ मार्च, १९४८ ला लिहिलेल्या पत्रात ते लिहितात:

> मला माहिती मिळाली आहे की रा.स्व. संघाच्या लोकांनी गोंधळ घालायची योजना बनवली आहे. त्यांचे अनेक लोक मुसलमानांचा वेष घालून, हिंदूंना भडकवण्याच्या इराद्याने त्यांच्यावर हल्ले करायला सज्ज आहेत. तसेच त्यांच्यात काही हिंदू असतील जे मुसलमानांवर हल्ले करतील व मुसलमानांना भडकवतील. याचा परिणाम म्हणजे हिंदू–मुसलमान दंगली भडकतील.[43]

रा.स्व. संघ आयएसआयसारख्या संस्थांना सहकार्यच करत नाही का?

आयएसआय या पाकिस्तानच्या हेर खात्याचे जालीम जाळे भारताचे सर्वधर्मसमभावी लोकशाही शासन उलथून टाकण्याचा प्रयत्न करत आहे, याबद्दल काही दुमत नाही. (शिवाय अमेरिकेची सीआयए, रशियाची केजीबी आणि इस्त्रायलची मोसाद या हेरयंत्रणांनाही एकसंध भारत पाहिजे याची काही खात्री नाही.) असे असले तरी आयएसआयच्या भारताचे तुकडे व्हावेत याच्या सर्वश्रुत योजनांकडे सखोलपणे लक्ष द्यायला हवे. योग्य आणि वस्तुनिष्ठ उत्तरं मागणारे असे अनेक गंभीर प्रश्न आहेत. पण आपल्या देशात जमातवादाला चिथावणी देणारी फक्त आयएसआय ही एकच शक्ती आहे हे खरं आहे का? ओरिसा, कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेशात ख्रिश्चनधर्मीयांवर झालेले हल्ले असो, १९९२ मध्ये रा.स्व. संघाच्या कार्यकर्त्यांनी बाबरी मशीद उध्वस्त करून केलेली जमातवादी फॅसिस्ट कृत्ये असो किंवा अलीकडील २००२ मध्ये गुजराथेतल्या मुसलमानांचे हत्याकांड असो, ह्या घटनांनी भारताला जमातवादी ज्वालामुखीच्या तोंडावर नेऊन बसवले आहे. अशा कृतींनी आयएसआयला आनंदाचे भरते येत नसेल का? हिंदुत्वाच्या झेंड्याखाली आपल्या देशात जमातवादी विद्वेषाची बीजे रोवणारे, संरक्षित, राज्यव्यवस्थेचा पाठिंबा असणारे, विविध धार्मिक गटातील शांतता धोक्यात आणणारे घटक नाहीत का? भारताचा विध्वंस ज्यांना करायचा आहे त्या आयएसआयचे काम हलके होत नाहिये का?

विश्व हिंदू परिषद, हिंदू जागरण मंच आणि बजरंग दल याशिवाय रा.स्व. संघाची इतर पिलावळ यांचा गुजराथ ही जमातवादी धुलाईची प्रयोगशाळा मानून तिथे विशेषतः ख्रिश्चन आणि मुसलमानांना धुवून काढण्याचा प्रयत्न गेली अनेक वर्ष सुरू आहे. ते आता सगळ्या देशभरात पसरत आहेत. त्यांची पत्रके अतिशय भडकवणारी आहेत. उदा.:

> ‘मुस्लिम म्हणजे गटारातली घाण’, तुमच्या घरात ही घाण येऊ देऊ नका किंवा ‘मुस्लिम किंवा ख्रिश्चन पाद्री जगभर फिरतात आणि लोकांना लुटतात.’ खोटारडेपणा आणि फसवेगिरी हा त्यांचा धर्म आहे. ख्रिश्चन पाद्री लोकांना धर्माच्या नावाने खोटे बोलायला, धर्माच्या नावावर चोऱ्या करायला शिकवतात . . . ते हिंदूंना शिव्या देतात आणि हिंदू धर्माला कमी लेखतात. हिंदूंनो, जागे व्हा आणि खोटे बोलणाऱ्या या चोरांशी संघर्ष करा. ते तुमचे हक्क तुमच्यापासून हिरावून घेतात. या लोकांना ताळ्यावर आणा आणि त्यांना

> त्यांची जागा दाखवा. ख्रिश्चन किंवा मुस्लिमांच्या लोकसंख्येत एका जीवाची भर पडणे म्हणजे फक्त हिंदूविरोधी शक्तीत भर पडणे नव्हे तर देशविरोधी व्यक्ती जन्माला येणे आहे.[44]

यासारखी पत्रके विश्व हिंदू परिषद, हिंदू जागरण मंच आणि बजरंग दलाच्या वतीने सुरुवातीला फक्त गुजरातमध्ये वाटली जात, आता देशाच्या विविध भागात वाटली जातात. या पत्रकांमधली हुकूमशाहीची भाषा केवळ कुणा माथेफिरू कार्यकर्त्याची नाही. वस्तुतः रा.स्व. संघाची गीता किंवा बायबल म्हटले जाते त्या *बंच ऑफ थॉट्स* मध्ये 'अंतर्गत धोके' या लांबलचक प्रकरणात मुसलमान आणि ख्रिश्चनांबद्दल धोके क्र. १ आणि क्र. २ अनुक्रमे असे लिहिलेले आहे. ह्या प्रकरणाची सुरुवातच खालील वाक्याने होते:

> जगभरातल्या अनेक राष्ट्रांच्या इतिहासाने शिकवलेला हा एक दुःखद धडाच म्हणावा लागेल की बाहेरच्या शत्रूंपेक्षा अंतर्गत शत्रूंनी उभे केलेले आव्हान देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नेहमीच अधिक गंभीर आणि धोकादायक असते.[45]

मुसलमानांबद्दल धोका क्र. १ म्हणून वर्णन करताना त्यांनी म्हटलेले आहे:

> आजही असे अनेकजण आहेत, जे म्हणतात, 'आता मुस्लिम हा काही प्रश्न म्हणून अजिबात उरलेला नाही. पाकिस्तान हवे म्हणणारे सगळे कडवे हटवादी लोक आता कायमचे बाहेर गेलेले आहेत. उरलेले सगळे मुस्लिम या देशावर जीव टाकणारे आहेत. शेवटी त्यांना जायला दुसरी जागा आहे कुठे, तेव्हा त्यांना या देशाशी इमान ठेवायलाच लागेल.' . . . पाकिस्तान झाल्यावर एका रात्रीत हे सगळे देशभक्त बनले असतील यावर विश्वास टाकणे ही केवळ आत्मघाताचीच कृती ठरेल. त्याउलट, पाकिस्तानच्या निर्मितीमुळे मुस्लिमांचे संकट आता हजारपटीने वाढलेले आहे, कारण पाकिस्तानमुळे आता भविष्यात आपल्या देशाच्या विरुद्ध अनेक विघातक योजना आखण्यासाठी त्यांना ही उड्डाणफळी मिळालेली आहे.[46]

सामान्य मुसलमान जनतेबद्दलही त्यांनी गरळ ओकली आहे:

> देशातही अनेक ठिकाणी मुस्लिमबहुल जागा आहेत, म्हणजे अनेक छोटे पाकिस्तानच . . . निष्कर्ष हा की जवळजवळ देशातल्या प्रत्येक ठिकाणाहून हे लोक पाकिस्तानशी ट्रान्समीटरवरून संपर्कात आहेत.[47]

गोळवलकरांच्या मते भारतातला प्रत्येक मुसलमान अविश्वासार्ह आणि बेइमान आहे:

> आजही मुस्लिम मग ते सरकारमध्ये अधिकाराच्या उच्च जागी असतील किंवा बाहेर असतील. उघडपणे राष्ट्रविरोधी परिषदांमध्ये भाग घेत असतात.[48]

अंतर्गत धोका क्र. २ बद्दल बोलताना ते म्हणतात,

> आपल्या देशात राहणाऱ्या ख्रिश्चन सदगृहस्थांची धारणाच आपल्या जीवनाचा धार्मिक आणि सामाजिक पोत नष्ट करायचा, इतकेच नव्हे तर प्रथम वेगवेगळ्या भागात आणि पुढे शक्य झाले तर आपल्या संपूर्ण देशात राजकीय वर्चस्व स्थापित करायचे हीच आहे.[49]

गोळवलकरांनी शेवटी हिटलरच्याच पावलावर पाऊल टाकून अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडवण्याचे ठरवलेले होते:

> या भूमिकेनुसार, आधीपासून अस्तित्वात असलेल्या धूर्त देशांच्या अनुभवांनी सिद्ध केल्यानुसार हिंदुस्थानात राहणाऱ्या परकीय वंशाच्या लोकांनी एकतर हिंदू संस्कृती आणि भाषा मान्य करावी, हिंदू धर्माला मान आणि आदर द्यावा, हिंदू वंश आणि संस्कृतीचं म्हणजेच पर्यायानी हिंदुस्थानचं उदात्तीकरण करावं. त्यांनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सोडून देऊन हिंदू धर्मात विलीन व्हावं, किंवा देशात राहायचं का, याचा विचार करावा. ह्या देशात त्यांना आश्रिताची जागा मिळेल, कशावरही हक्क सांगता येणार नाही, कुठल्याही विशेष सोयी सुविधा मिळणार नाहीत, अगदी नागरिकांचे हक्क देखील नाहीत. त्यांना सामावून जाण्याशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही, म्हणजे उरायला नको. आपला प्राचीन देश आहे, या देशात राहायचे ठरवणाऱ्या परकीयांशी प्राचीन देशांना नेहमीच सामना करावा लागतो आणि अशाच प्रकारे सामना करावा.[50]

मुस्लिम लीग प्रमाणे द्विराष्ट्र संकल्पनेवर रा.स्व. संघाचा विश्वास आहे का?

हिंदूंचा असा स्वतंत्र देश असे म्हणताना खरंतर, रा.स्व. संघ मुस्लिम लीगच्या दोन देशांच्या कल्पनेलाच पाठिंबा देत आहे. भिन्न वर्णाच्या आणि समाजाच्या गटांसाठी दोघांचाही एकच दृष्टिकोन आहे. मुस्लिम लीगच्या कितीतरी आधीच हिंदू महासभेच्या वि.दा. सावरकरांनी भारतात द्विराष्ट्र संकल्पना मांडली होती. सावकरांना हेडगेवार आपले मार्गदर्शक आणि गुरू मानत असत हे महत्त्वाचं आहे. त्या दोघांच्या नात्याबद्दल धनंजय कीर यांनी अधिकृतपणे लिहिलेल्या सावरकरांच्या चरित्रात म्हटलेले आहे,

> राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही स्वयंसेवी संस्था सुरू करण्यापूर्वी डॉ. हेडगेवार यांनी सावरकरांशी संस्थेचा पाया, स्वरूप आणि भविष्य यावर दीर्घचर्चा केलेली होती. एक थोर हिंदू नेता व एक कडवा प्रामाणिक देशभक्त असलेल्या डॉ. हेडगेवारांना हिंदू तरुणांच्या ऊर्जेचे रक्षण करून तिला हिंदूराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी योग्य मार्गदर्शन करायचे होते. गांधींची असहकाराची चळवळ कोसळल्यावर आणि खिलाफत चळवळीचा बोजवारा उडाल्यानंतर राष्ट्र नतमस्तक होऊन पडले होते व गोंधळलेल्या विद्यार्थी जगतात अराजक माजले होते. त्यांच्या या गोंधळलेल्या अवस्थेत सावरकर आणि इतरांचा सल्ला घेऊन हेडगेवारांनी हिंदू समाजाला ताकद आणि आधार मिळावा म्हणून संस्था सुरू करण्याचा निर्णय घेतला.[51]

रा.स्व. संघाचे आणखी एक प्रभावी व्यक्तिमत्व असलेले माजी उपपंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री लालकृष्ण अडवानीही सावरकरांच्या हिंदुत्वाने प्रेरित झाले असल्याचे त्यांनी मान्य केले. पोर्ट ब्लेअरला गेलेले असताना त्यांनी जमलेल्या लोकांना सांगितले की "हिंदुत्व, ज्याला वीर सावरकरांनी खूप विस्तारानी समजावले आहे, याबाबत लाज वाटण्याची काहीच गरज नाही." ते पुढे म्हणाले, "ती एक सर्व समावेशक विचारसरणी आहे आणि त्याची पाळेमुळे या देशाच्या परंपरेत आहेत."

अडवानींना ही भयानक वस्तुस्थिती माहीत असणारच की सावरकर हे द्विराष्ट्र संकल्पनेचे ठाम पुरस्कर्ते होते. अहमदाबादमध्ये १९३७ साली हिंदूमहासभेच्या १९ व्या सत्राला उद्देशून भाषण करताना ते म्हणाले होते:

> असेही भारतात एकमेकांशी शत्रुत्व असलेली दोन राष्ट्रे एकमेकांशेजारी राहत आहेत. भारत एक एकात्म आणि सुसंवादी राष्ट्र आहे असं मानण्याची अत्यंत

गंभीर चूक पोरकट राजकारणी करत आहेत, किंवा कदाचित ते तसं होऊ शकतं अशी अपेक्षा करत आहेत. हे आमचे प्रामाणिक सद्‌हेतू असलेले पण विचार न करणारे मित्र त्यांची स्वप्नं सत्य मानत आहेत. त्यामुळे ते जमातवादी प्रश्नांबाबत हातघाईवर येत आहेत आणि त्याची जबाबदारी जातजमातवादी संस्थांवर टाकत आहेत. वस्तुस्थिती ही आहे की हे तथाकथित जमातवादी प्रश्न हिंदू आणि मुस्लिमांमध्ये असलेल्या शेकडो वर्षांच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि राष्ट्रीय आंतरविरोधाच्या परंपरेतून मिळाले आहेत. योग्य वेळ आली की तुम्ही ते प्रश्न सोडवालही; पण ते नाहीतच असे मानून तुम्ही ते दाबून टाकू शकत नाही. शरीरात मुरलेला जुनाट आजार दुर्लक्ष न करता तो काय आहे, हे तपासून त्यावर उपाययोजना करावी लागते. आपण धैर्याने या कटू सत्याला सामोरे जायला हवे. भारत आज एकसंध एकात्मिक राष्ट्र मानता येण्याजोगे नाही, उलट त्यामध्ये दोन प्रमुख राष्ट्रे आहेत, एक हिंदू आणि दुसरे मुसलमान.[52]

इथे ही वस्तुस्थिती विसरता कामा नये की, मुस्लिम लीगने १९४० मध्येच पाकिस्तान निर्मितीचा ठराव पारित केला होता. द्विराष्ट्रवादाचा प्रसार खूप आधीच ज्यांनी केला होता ते रा.स्व. संघाचे श्रेष्ठ तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक सावरकरांनी मुस्लिम लीगला नुसता पाठिंबाच दिला नाही तर *चले जाव*ची चळवळ मोडून काढण्यासाठी त्यांच्याबरोबर गटबाजीही केली. कानपूर येथे १९४२ मध्ये झालेल्या हिंदूमहासभेच्या २४ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी म्हटलेले आहे:

राजकारणाच्या प्रत्यक्ष व्यवहारात आपल्याला पुढे जायचे असेल तर काही आवश्यक तडजोडी कराव्या लागतील हे महासभेला माहीत आहे. नजीकच्या काळातील सिंधमधील घडामोडी बघितल्या तर सिंध–हिंदूसभेने आमंत्रणावरून एकत्र सरकार स्थापन करण्यासाठी लीगशी हातमिळवणी करण्याची जबाबदारी घेतलेली आहे. बंगालची परिस्थिती आपल्याला ठाऊकच आहे. लीगचे लोक इतके रानटी की, काँग्रेसही आपल्या नम्रपणाने त्यांना शांत करू शकली नव्हती, ते हिंदूमहासभेच्या संपर्कात आल्याबरोबर खूपच समजूतदार झालेत, माणसाळलेत. फझल-उल हक आणि आपल्या महासभेचे आदरणीय कुशल नेते श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली बनलेले युतीचे सरकार वर्षभर दोन्ही गटांच्या हिताच्या दृष्टीने अतिशय उत्तमप्रकारे काम करत आहे. इतकेच नाही तर त्यानंतरच्या घटनांमधून हेही स्पष्ट होते आहे की हिंदूमहासभेने राजकीय सत्ताकेंद्र काबीज करण्याचे परिश्रम घेतलेत ते जनतेसाठी, त्यातून

स्वतःची तुंबडी भरण्यासाठी नाही.[53]

सावरकरांच्या पावलावर पाऊल ठेवून रा.स्व. संघानेही हिंदू व मुसलमान एका देशात एकीने राहू शकतात व एकसंध राष्ट्र बनवू शकतात ही कल्पना पूर्णतः नाकारली. १४ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला, रा.स्व. संघाचे इंग्रजी मुखपत्र असलेल्या *ऑर्गनायजर*च्या संपादकीय लेखाने संघाची राष्ट्र संकल्पना मांडली:

> राष्ट्राच्या भाकड संकल्पनांना आता आपण भुलायचं बंद करावं. हिंदुस्थानात राष्ट्र म्हणून केवळ हिंदूंचाच समावेश होतो आणि याच सुरक्षित व भक्कम पायावर राष्ट्रीय इमारत बांधली गेली पाहिजे. हे सोपे वास्तव मान्य केले की बराचसा मानसिक गोंधळ दूर होईल, वर्तमानातील व भविष्यातील कटकटी दूर करता येतील . . . राष्ट्रच मुळी हिंदू, हिंदू परंपरा, संस्कृती, संकल्पना व आकांक्षा यावर बनले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्यपूर्व भारतातील सांप्रदायिक समस्यांचा खोलवर अभ्यास केला होता. द्विराष्ट्र संकल्पनेच्या आधारे हिंदू महासभा व मुस्लिम लीग यांच्यात जमलेल्या दोस्तीला अधोरेखित करताना ते लिहितात:

> अजब वाटेल, पण श्री. सावरकर व श्री. जिना हे दोन–राष्ट्र संकल्पनेबद्दल परस्पर विरोधी नाहीत तर पूर्णपणे सहमत आहेत. केवळ सहमतच नाही तर एकत्र आग्रह धरतात की भारतात दोन राष्ट्र आहेत—एक मुस्लिम-राष्ट्र व दुसरे हिंदू-राष्ट्र.[54]

ही सगळी वस्तुस्थिती आपल्यासमोर असताना रा.स्व. संघ देशासाठी किती धोकादायक आहे हे समजणे अवघड जाणार नाही. रा.स्व. संघाला सांगायची वेळ आता आली आहे की त्यांनी आता तरी देशाच्या मुख्य प्रवाहात सामावून घ्यावे आणि आपल्याला भारतीय म्हणवण्यासाठी स्वतःमध्ये प्रभावी सुधारणा घडवाव्यात. असे केले म्हणजे लोकशाहीचा, धर्मनिरपेक्षतेचा आणि संघराज्य भावनेचा नाश करू इच्छिणाऱ्या देशद्रोही शक्तींना सहकार्य करण्याची भूमिका त्यांच्यावर येणार नाही.

संदर्भसूची

1 M.S. Golwalkar, *We Or Our Nationhood Defined*, Bharat Publications, Nagpur, 1939, p. 35.

2 Ibid, p. 47.

3 Marzia Casalori, "Hindutva's Foreign Tie-up in the 1930s – Archival Evidence", *Economic and Political Weekly*, January 22, 2000, pp. 218–19.

4 V.D. Savarkar, *Samagar Savarkar Wangmaya: Hindu Rashtra Darshan* (Collected Works of Savarkar), Vol. VI, Maharashtra Prantik Hindusabha, Poona, 1963, p. 418.

5 Cited in Marzia Casalori, op. cit., p. 223.

6 Ibid.

7 M.S. Golwalkar, *Shri Guruji Samagar Darshan* (collected works of Golwalkar in Hindi), Bhartiya Vichar Sadhna, Nagpur, nd., Volume I, p. 98. Hereafter referred as *SGSD*.

8 For more material on this issue, see: https://www.academia.edu/1103098/Tiranga_for_Muslims_And_Saffron_For_Hindus_By_Shamsul_Islam

9 M.S. Golwalkar, *Bunch of Thoughts*, Sahitya Sindhu, Bangalore, 1996, pp. 237–238.

10 Ibid, p. 238.

11 V.D. Savarkar, "Women in Manusmriti" in *Savarkar Samagar,* Vol. IV, Prabhat, Delhi, 2000, p. 416.

12 This selection of Manu's codes is from F. Max Muller, *Laws of Manu* (Delhi, LP Publications, 1996, first published in 1886). The bracket after each code incorporates number of chapter / number of code according to the above edition.

13 M.S. Golwalkar, *We Or Our Nationhood Defined*, op. cit., p. 36.

14 *Manusmriti* (Hindi), Sadhna, Delhi, 1999.

15 Swami Ramsukhdas, *How to Lead a Household Life*, Geeta Press, Gorakhpur, 1999, p. 43. (Geeta Press has more than 15 titles denigrating women in many Indian languages including English. Some of the titles openly preach Sati and violence against women which are serious crimes under Indian Penal Code.

16 Ibid. p. 36.

17 RSS, *Shakha Darshikha*, Gyan Ganga, Jaipur, 1997, p. 1.

18 Ibid., p. 66.

19 *SGSD*, Volume I, p. 11.

20 Ibid., Volume III, p. 128.

21 Ibid., p. 70.

22 M.S. Golwalkar, *Bunch of Thoughts*, op. cit., p. 227.

23 Cited in *Justice on Trial*, RSS, Bangalore, 1962, p. 64.

24 Ibid., p. 65–66.

25 Ibid., p. 26–28.

26 Letter 64 in Sardar Patel, *Selected Correspondence 1945–50*, Volume 2, Navjivan Publishing House, Ahmedabad, 1977, p. 276–77.

27 *SGSD*, Volume IV, pp. 39–40.

28 Ibid., p. 41.

29 Ibid., p. 40.

30 Ibid., Volume I, p. 109.

31 Ibid., pp. 109–10.

32 Ibid., Volume IV, p. 2.

33 Ibid., Volume I, pp. 11–12.

34 C.P. Bhishikar, *Sanghavariksh Ke Beej: Dr. Keshavrao Hedgewar*, Suruchi, 1994, p. 24.

35 M.S. Golwalkar, *Bunch of Thoughts*, op. cit., p. 283.

36 C.P. Bhishikar, op. cit., p. 21.

37 *SGSD*, Volume I, p. 121.

38 Ibid., pp. 61–62.

39 Ibid., Volume III, p. 32.

40 Ibid., Volume IV, pp. 4–5.

41 S.D. Sapre, *Parm Vaibhav Ke Path Per*, Suruchi, Delhi, 1997, p. 7.

42 Ibid., p. 86.

43 Rajendra Prasad to Sardar Patel, March 14, 1948, cited in Neerja Singh (ed.), *Nehru–Patel: Agreement Within Difference – Selected Documents and Correspondences, 1933–50*, NBT, Delhi, p. 43.

44 From leaflets of the offsprings of the RSS like VHP, Bajrang Dal, Hindi Jagaran Manch, etc.

45 M.S. Golwalkar, *Bunch of Thoughts*, op. cit., p. 177.

46 Ibid., pp. 177–178.

47 Ibid., p. 185.

48 Ibid., p. 187.

49 Ibid., p. 193.

50 M.S. Golwalkar, *We Or Our Nationhood Defined*, op. cit., pp. 47–48.

51 Dhananjay Keer, *Veer Savarkar*, Popular, Bombay, 1950, pp. 170–171.

52 V.D. Savarkar, *Samagar Savarkar Wangmaya: Hindu Rashtra Darshan* (Collected Works of Savarkar), Vol. VI, Hindu Mahasabha, Poona, 1963, p. 296.

53 Ibid., pp. 479–80. Hindu Mahasabha and Muslim League also ran a coalition government in North-Western Frontier Province.

54 B.R. Ambedkar, *Pakistan or the Partition of India*, Govt. of Maharashtra, Bombay, 1990, p. 142.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला ओळखण्याची गरज का?

- रा.स्व. संघ देशातील सर्वात बड्या राजकीय शक्तींपैकी एक आहे. राजकारण, शिक्षणक्षेत्र, सामाजिक काम, धर्मसंस्था, सांस्कृतिक क्षेत्र, विज्ञान, क्रीडा अशा सर्व क्षेत्रात रा.स्व. संघाच्या अधिकृत आणि अनधिकृत संघटनांचे जाळे पसरले आहे.

- भारतीय समाजात आपली हिंदुत्ववादी विचारधारा रुजवण्यासाठी व तिचा प्रसार करण्यासाठी रा.स्व. संघाचे कार्यकर्ते—ज्यांना स्वयंसेवक म्हटले जाते—सक्रियपणे कार्यरत आहेत.

- आम्ही राजकारणापासून अलिप्त आहोत, आम्ही सांस्कृतिक संघटना असून सामाजिक काम करतो, असे दावे जरी रा.स्व. संघाकडून केले जात असले तरी, सध्या सत्तेवर असलेल्या भाजपवर त्यांचे उघडपणे नियंत्रण आहे.

- सध्याचे पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, संरक्षणमंत्री यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, संसदेतील अनेक खासदार, भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री हे रा.स्व. संघाचे निष्ठावान स्वयंसेवक आहेत.

- आज जरी देशातील सर्व प्रमुख घडामोडींवर रा.स्व. संघाचा प्रभाव असला तरी या संघटनेबाबत, त्याची व्याप्ती, इतिहास, विचारधारा आणि कामकाजाच्या पद्धतीबद्दल बहुसंख्य सर्वसामान्य लोक अनभिज्ञ आहेत, अनेकजण तर हिंदुत्व या राजकीय विचारधारेची गल्लत हिंदू धर्माच्या जगण्याच्या सांस्कृतिक पद्धतीशी करतात.

- आपण राष्ट्रीय संघटना असल्याचा दावा रा.स्व. संघ करतो, मात्र, स्वातंत्र्य चळवळी दरम्यान आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रा.स्व. संघाचे नेते राष्ट्रीय ध्वज, राष्ट्रगीत आणि भारतीय संविधानावर कठोर टीका करत होते, तसेच अनेक संशयास्पद व वादग्रस्त कृत्यात सहभागी होते.

त्यामुळेच या संघटनेचा खरा चेहरा जनतेसमोर आणणे अतिशय महत्त्वाचे आहे.

संघाची खरी विचारधारा आणि छुपी उद्दिष्टे उघड करणारे हे पुस्तक लिहिताना लेखक **शम्सुल इस्लाम** यांनी रा.स्व. संघ प्रकाशित कागदपत्रांचाच आधार घेतला आहे. त्यामध्ये संघ-संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांच्या कार्यावरील ग्रंथांचाही समावेश आहे.

लोकायत

सम्यक विद्रोही

सहयोग मूल्य रु.१०/-